R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
नवा काळ
NAVAKAL
• मुंबई, सोमवार १८ ऑक्टोबर, २०२१ • वर्ष-९९, अंक-२२३, पाने-८, किंमत : ₹ ४
• Issue-223 Vol.-99 Marathi - Daily - Mumbai, 18 October-2021 Page- 8 Price- Rs. 4/-
24x7 : www.navakal.in • संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

# आर्यन खानची ब्लड व युरीन चाचणी केलीच नाही?



**मुंबई -** शाहरुख खानचा पुत्र आर्यन खान सध्या आर्थर रोड जेलमध्ये आहे. बुधवारी त्याच्या व इतर आरोपींच्या जामीन बाबत निर्णय होणार आहे. मात्र सध्या जोरदार चर्चा सुरू आहे की, आर्यनला अटक केल्यावर त्याची रक्त व मुत्र चाचणी केलेलीच नाही. भारतीय कायद्यानुसार अमली पदार्थ सेवन हा गुन्हा असून एक वर्षाची सजा आहे. हा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अमली पदार्थ सेवन केल्यानंतर २४ तासात रक्त व मुत्र चाचणी करावी लागते. या चाचणी नेच सेवन सिद्ध होते. पण आर्यन खान याची अशी चाचणी केलेलीच नाही अशी चर्चा आहे. कारण अशा चाचणीचा अहवाल न्यायालयात सादर केलेला नाही. याबाबत एनसीबीकडून खुलासा अपेक्षित आहे. आर्यन आणि त्याचा मित्र हे अमली पदार्थांचे सेवन आणि विक्री करीत होते आणि त्यांचा आंतरराष्ट्रीय टोळीशी संबंध आहे असा संशय असल्याचे सांगून त्यांच्या जामीन अर्जाला विरोध केला आहे.

# जवान-नागरिक सीमेवर शहीद होताहेत
# पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना नकोच!

आयसीसी टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा सुरू होत असताना २४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या भारत - पाकिस्तान सामन्याला आता विरोध होताना दिसत आहे. गेल्या सहा दिवसात दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये ९ जवान शहिद झाले आहेत. यावर्षी आतापर्यंत २६ नागरिक आणि २५ जवान शहीद झाले आहेत. यामध्ये दोन गैर काश्मीरी नागरिकांचा समावेश असून त्यामध्ये बिहारच्या एका गरीब पाणीपुरी विक्रेत्याचा समावेश आहे. आपले जवान- नागरिक सीमेवर शहीद होताहेत, या पार्श्वभूमीवर पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना नकोच, अशी चर्चा आता होताना दिसत आहे.



### अंगात नाही बळ आणि चिमटा घेऊन पळ

पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर इमरान यांनी भारतासमोर मैत्रीचा हात तर पुढे केला, पण मैत्रभाव टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न मात्र केले नाहीत. याउलट 'अंगात नाही बळ आणि चिमटा घेऊन पळ,' अशा कुरापतींमध्येच पाकिस्तान आघाडीवर राहिले. त्यामुळे क्रिकेट आणि राजकारण यांच्यात सरमिसळ होऊ नये, असे कितीही म्हटले तरी पाकिस्तानला अद्दल घडवायची असेल, तर त्यासाठी चहुबाजूंनी त्यांची कोंडी करायला हवी, अशीही एक बाजू समोर येताना दिसत आहे.

■ मुंबई

**सीमारेषेवर** जवान शहीद होत आहेत. ते देशासाठी गोळ्या झेलतायत, पण त्याच वेळेला आपण पाकिस्तानशी क्रिकेट खेळणार असू तर त्या सीमेवर रक्षणासाठी उभ्या असलेल्या जवानांना काय वाटेल, याचा विचार व्हायला हवा. सीमेजवळच्या क्षेत्रात हिंसाचाराच्या घटना वाढल्याने दोन्ही देशातले संबंध ताणले गेले आहेत. पाकिस्तानने अनेकदा शस्त्र संधीचे उल्लंघन केले आहे. यामुळे २०१३ पासून भारत पान ७ वर

# दिवाळीनंतर एकाच लसीवर लोकल प्रवास करता येणार?



**गेल्या काही दिवसांपासून राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत चालला असल्याने अनेक नियमांमध्ये शिथिलता देण्यात आली आहे. आता महाराष्ट्र हळूहळू संपूर्ण अनलॉक होण्याच्या दिशेनं प्रवास करत आहे. शाळा, मंदिरं सुरु झालेली आहेत. त्या पार्श्वभूमीवर दिवाळीनंतर नागरिकांना कोरोनाच्या एकाच लसीच्या डोसवर मॉल, लोकल तसेच इतर सर्वच ठिकाणी प्रवेश मिळणार आहे. दिवाळीनंतर मुख्यमंत्री याबाबत निर्णय घेणार असल्याची माहिती आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिली.**

■ मुंबई

**टोपे म्हणाले की,** काही दिवसांवर दिवाळी येतेय. संपूर्ण संणामध्ये लोक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. मंदिरं, थिएटर्स उघडली आहेत. आता यानंतर कोरोना रुग्णांची संख्या कमी वाढते या सर्व पार्श्वभूमिवर निर्णय होईल, असं ते म्हणाले. संख्या आटोक्यात राहिली तरच सवलत मिळेल, असं ते म्हणाले. राज्यामध्ये दिवाळीनंतरच्या कोरोना आकडेवारीनंतर आरोग्य विभागाशी चर्चा करुन मुख्यमंत्री निर्णय घेतील, असं टोपे म्हणाले.

# जरंडेश्वरपासून ७० बेनामी मालमत्तेत अजित पवारांच्या बहिणी व मेहुणे पार्टनर

## किरीट सोमय्या यांचे अजित पवारांवर गंभीर आरोप

■ सोलापूर

**जरंडेश्वर** साखर कारखान्यापासून अजित पवार यांच्या ७० बेनामी संपत्तीत, कंपन्यांमध्ये त्यांच्या बहिणी, मेहुणे भागीदार आहेत. मग अजित पवारांनी महाराष्ट्राच्या साडेबारा कोटी जनतेशी बेईमानी केली की आपल्या बहिणींशी बेईमानी केली? असा सवाल माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला. ठाकरे सरकारचे रिमोट कंट्रोल असलेले शरद पवारांनी माझ्या आरोपाला उत्तर द्यावे. हे कागदोपत्री पुरावे मी ईडी, उच्च न्यायालय, सीबीआयकडे



देणार असल्याचे त्यांनी सांगितले. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते रविवारी सोलापूर दौऱ्या वर आले होते. त्यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी सोमय्या म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारने केलेले भ्रष्टाचार ही एक प्रकारची डकेती आहे. शिवानी जयचंद प्रा.लि आणि इंडिकॉम डेव्हलपर्स प्रा. लि कोण आहे? यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना १०० कोटी रुपये किती वर्षांपूर्वी दिले? कशासाठी दिले? हे शरद पवारांना मान्य आहे का? अशा प्रश्नाची सरबत्ती पान ७ वर

# मुंबई उच्च न्यायालयाची सुट्टी चार दिवसांवर आणा

**मुंबई** - महिन्यात पहिल्या आठवड्यात दीपोत्सव अर्थातच दिवाळीचा सण आहे. त्या पार्श्वभूमीवर मुंबई हायकोर्टाला १ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर दरम्यान सुट्टी असणार आहे. परंतु सलग इतके दिवस कोर्टाचे कामकाज बंद राहिल्याने जनतेची कामे मात्र खोळंबणार आहेत. त्यामुळे कोर्टाची दिवाळीची सुट्टी चार दिवसांवर आणावी, अशी मागणी प्रतिवाद्यांकडून होत आहे. ऑगस्ट ते डिसेंबर हा काळ सरकारी कर्मचारी आणि वकिलांसाठी सुट्ट्यांचा धमाका असतो. गेले दोन वर्षे सर्वजण कोरोनाचा सामना करत आहेत. एकीकडे कोरोना व लॉकडाऊनमुळे हजारो केसेस शिल्लक असताना एवढ्या जवळजवळ अर्धा महिना कोर्टाची दारं बंद ठेवणे, योग्य आहे का? असा सवाल आता केसेसच्या निर्णयाकडे लक्ष लागून राहिलेल्या अशिलांमार्फत विचारला जात आहे. कोर्टात रोज हजारो प्रकरणे दाखल होतात. यामध्ये आधीच लॉकडाऊनमुळे गुन्हेगारी तसेच इतर विषयांच्या अनेक केसेची भर पडली आहे. त्यामुळे या वाढत्या केसेसचा डोलारा कमी करण्याची गरज आहे. नोव्हेंबरमध्ये जवळजवळ १५ दिवस तर डिसेंबरमध्ये २४ ते ३१ असे सात दिवस मुंबई हायकोर्टाचे कामकाज बंद राहणार असल्याने न्यायालयीन व्यवस्थेवर भार पडणार आहे.

# मुंबईत २० ऑक्टोबरपासून दोन शिफ्टमध्ये कॉलेजेस सुरू

■ मुंबई

**राज्यातील** महाविद्यालयांबरोबर मुंबईतीलही महाविद्यालये बुधवारी २० ऑक्टोबरपासून नियमित सुरू होणार आहेत. मात्र ती दोन शिफ्टमध्ये कोरोनाचे नियम पाळून सुरू केली जाणार आहेत. त्यासाठी मुंबई महापालिकेने नियमावली जाहीर केली आहे. त्यात क्षमतेच्या ५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि शक्य त्या ठिकाणी दोन सत्रांमध्ये वर्ग भरण्याचे निर्देश दिले आहेत. कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना यात प्राधान्य आहे, अशी माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली. राज्यातील अकृषी



विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांची संलग्न कॉलेजेस २० ऑक्टोंबरपासून नियमित सुरू होतील, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली होती. त्यानुसार बुधवारपासून महाविद्यालये सुरू होणार आहेत. त्यासाठी मुंबई महापालिकेने नियमावली जाहीर केली आहे. यात ५० टक्के क्षमतेने महाविद्यालये सुरू करण्यास सांगितले आहे. याशिवाय जेथे शक्य आहे तेथे दोन शिफ्टमध्ये महाविद्यालये सुरू करावी, अशी सूचना केली आहे. राज्य सरकारनेही महाविद्यालयांबाबत काढलेल्या नियमावली दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे आणि इतरांना ऑनलाइन शिक्षण देण्याचे निर्देश दिले आहेत.

# दरवाढ सुरूच! पेट्रोल-डिझेल ३५ पैशांनी महागले



■ मुंबई

**ऑक्टोबर** महिन्याच्या अगदी पहिल्या तारखेपासून सुरू झालेली पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीची मालिका काही केल्या थांबायला तयार नाही. आज रविवारीही पेट्रोल-डिझेल महागले. दोन्हींचे दर ३५ पैशांनी वाढले. पेट्रोल पंपावरच्या मीटरचे आकडे दररोज जितक्या वेगाने वाढत आहेत तितक्याच वेगाने आपला खिसाही रिकामा होत चालला आहे. आजच्या दरवाढीनंतर दिल्लीत पेट्रोल १०५.८४ रुपये प्रतिलिटरवर पोहोचले, तर डिझेलची किंमत आता ९४.५७ रुपये प्रतिलिटरवर पोहोचली आहे.

ऑक्टोबर महिन्यात इंधनाच्या दरात १३ वेळा वाढ झाली आहे. या काळात पेट्रोल ३.८५ रुपयांनी, तर डिझेल प्रतिलिटरमागे ४.३५ रुपयांनी महाग झाले आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी आज जाहीर केलेल्या दरांनुसार मुंबईत पेट्रोलचा प्रतिलिटर दर १११.७७ रुपये इतका असून एका लिटर डिझेलसाठी १०२.५२ रुपये मोजावे लागत आहेत. तर पॉवर पेट्रोलचा प्रतिलिटर दर ११५.७३ रुपये इतका आहे. तसेच राजधानी दिल्लीत पेट्रोल आणि डिझेलचा दर अनुक्रमे १०५.८४ रुपये आणि ९४.५७ रुपये इतका आहे. दरम्यान, इंधनाची दरवाढ अशीच सुरू राहिल्यास पेट्रोल लवकरच १२० रुपये प्रतिलिटरचा टप्पा गाठेल, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# भवरी देवी अपहरण व खून प्रकरणातील माजी मंत्री महिपाल मदेरना यांचे निधन

■ जोधपूर

**राजस्थानातील** भवरी देवी अपहरण आणि खून प्रकरणातील मुख्य आरोपी माजी मंत्री महिपाल मदेरना यांचे आज रविवारी सकाळी पावणेआठ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून मदेरना गंभीर आजाराशी लढा देत होते. अशोक गेहलोत सरकारमध्ये मदेरना कॅबिनेट मंत्री होते. भवरीदेवी या महिलेचे अपहरण करून तिची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी मदेरना यांचे नाव आले. यानंतर त्यांची मंत्रिपदावरून हकालपट्टी करण्यात आली होती. या प्रकरणातील ते मुख्य संशयित आरोपी होते. सध्या ते जामिनावर होते. राजस्थान काँग्रेसवर वर्चस्व असलेल्या परसराम मदेरना यांचे पुत्र असलेल्या महिपाल मदेरना यांची राजकीय कारकीर्द भवरी देवी प्रकरणामुळे झाकोळून गेली. गेहलोत सरकारमध्ये मदेरना जलसंपदा मंत्री होते. भंवरी देवी अपहरण आणि हत्या प्रकरणात मदेरना १० वर्षे तुरुंगात होते. ते मंत्री असतानाच त्यांना अटक करण्यात आली होती.



त्यांना कर्करोगावरील उपचारासाठी तुरुंगातून जामीन मिळाला होता.काँग्रेस नेते महिपाल मदेरना यांचा जन्म ५ मार्च १९५२ रोजी झाला. जय नारायण व्यास विद्यापीठातून शिक्षण घेतल्यानंतर ते राजकारणात उतरले. राजस्थान काँग्रेसमधील बडे प्रस्थ म्हणून मदेरना यांच्याकडे पाहिले जात होते.

# चीनच्या महाविनाशक हायपरसॉनिक अण्वस्त्र सज्ज क्षेपणास्त्राची चाचणी

■ बीजिंग

**जगावर** आपला दबदबा निर्माण करण्याच्या विचाराने झपाटलेल्या चीनने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. हायपर्सॉनिक या महासंहारक क्षेपणास्त्राची आज चाचणी केली. अण्वस्त्र वाहून नेण्याची क्षमता असलेले हे क्षेपणास्त्र अतिशय धोकादायक आहे.

अमेरिका, रशिया आणि इतर ५ देशांकडे हायपर्सॉनिक टेक्नॉलॉजी आहे. असे असताना चीननेही हायपर्सॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी घेतल्यामुळे अमेरिकेची चिंता वाढली आहे. हे क्षेपणास्त्र पृथ्वीच्या कक्षेत आपले लक्ष्य सहज गाठू शकते. ऑगस्टमध्ये चीनने याची चाचणी घेतली. त्यावेळी ३२ किलोमीटरने त्याचे लक्ष्य चुकले होते. आण्वस्त्र



वाहून नेण्याची क्षमता आणि आवाजाच्या पाचपट वेग असलेले हे क्षेपणास्त्र आहे. अवकाशात ते लांब पल्ला गाठू शकते. वेगाने लक्ष्य गाठू शकते. वायुमंडळाच्या जवळ जाण्याची त्याची क्षमता आहे.

# बँकिंग कामे उरकून घ्या! पुढील आठवड्यात बँका सहा दिवस राहणार बंद

■ नवी दिल्ली

**पुढील** आठवड्यात येणाऱ्या सणांमुळे विविध राज्यात बँका सलग अनेक दिवस बंद राहणार आहेत. त्यामुळे बँके संदर्भातील महत्त्वाची कामे आत्ताच उरकून घ्या. बँकेच्या बहुतांश सुट्ट्या प्रादेशिक सुट्ट्या आहेत. याचा अर्थ असा की जर एखाद्या राज्यात बँका बंद राहिल्या तर दुसऱ्या राज्यात बँकिंगचे काम चालू राहील. या सगळ्या सुट्ट्या एकत्रित केल्यास देशाच्या विविध भागात येत्या आठवड्यात सलग सहा दिवस बँका बंद राहतील. ऑक्टोबरच्या पहिल्या १५ दिवसात ११ दिवस बँका बंद होत्या. शनिवार, १६ ऑक्टोबर रोजी गंगटोक, सिक्कीम येथे दुर्गा पूजेच्या निमित्ताने बँका बंद राहिल्या, तर १७ ऑक्टोबर रोजी रविवार असल्याने देशभरातील बँका बंद होत्या.

### कोणत्या सणांसाठी बँका बंद असतील?

**१८ ऑक्टोबर-** आसामच्या गुवाहाटीमध्ये काटी बिहू उत्सवामुळे बँका बंद राहतील. **१९ ऑक्टोबर-** पैगंबर मुहम्मद यांची जयंती असलेल्या ईद-ए-मिलादच्या निमित्ताने नवी दिल्ली, भोपाळ, अहमदाबाद, बेलापूर, चेन्नई, डेहराडून, हैदराबाद, इंफाल, जम्मू, कानपूर, कोची येथे बँका बंद राहतील. लखनौ, मुंबई, नागपूर, रायपूर, रांची, श्रीनगर आणि तिरुअनंतपुरममध्ये बँकिंग ऑपरेशन्स होणार नाहीत. **२० ऑक्टोबर -** वाल्मिकी जयंतीनिमित्त बंगळुरू, चंदीगड, शिमला, कोलकाता आणि अगरतळा येथे बँका बंद राहतील. **२२ ऑक्टोबर**-ईद-ए-मिलाद-उल-नबीनंतर जम्मू आणि श्रीनगरमध्ये बँका बंद राहतील. **२३ ऑक्टोबर -** चौथ्या शनिवारमुळे भारतभर बँका बंद राहतील. **२४ ऑक्टोबर -** रविवारी बँका बंद राहतील.

# गुरु माँ कांचन गिरी आज राज ठाकरेंची भेट घेणार

**मुंबई** - मराठी माणसाच्या मुद्यावर मनसेने गेली १३ वर्षे राजकारण केले. मात्र आता राज ठाकरे यांनी हिंदुत्वाचा झेंडा हाती घेतला आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि मनसेत जवळीक आल्याचेही पाहायला मिळत आहे. अशातच हिंदू राष्ट्राच्या बांधणीसाठी गुरु माँ म्हणून प्रसिध्द असलेल्या कांचन गिरी आणि जगतगुरु सूर्याचार्य उद्या सोमवारी सकाळी ११ वाजता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या कृष्णकुंज या निवासस्थानी भेट घेणार आहेत. माँ कांचन गिरी आणि जगतगुरु सुर्याचार्य यांचे आज सकाळी ११.१५ वाजता एअर इंडियाच्या विमानाने मुंबईत आगमन झाले. मुंबईत आगमन होताच माँ कांचन गिरी यांनी राज ठाकरे यांचे कौतुक केले. राज ठाकरे यांच्यात बाळासाहेब ठाकरे यांची छबी दिसते. बाळासाहेब ठाकरे यांचा संकल्प राज ठाकरे पुर्ण करतील. राज ठाकरे यांच्या मनात जो काही पुर्वाग्रह निर्माण झाला आहे तो दूर करेन. ते समजूतदार आहेत. त्यामुळे ते समजून घेतील, असेही कांचन गिरी यांनी म्हटले. हिंदूराष्ट्राच्या बांधणीसाठी मी मुंबईत दाखल झाले आहे. उद्या सोमवारी सकाळी ११ वाजता कृष्णकुंज येथे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# राजीनामा मागे घेतल्यानंतर नवज्योत सिद्धू पुन्हा आक्रमक

■ नवी दिल्ली

**पंजाब** काँग्रेसमध्ये गेल्या काही दिवसांपासून राजकीय घडामोडी घडत आहेत. कॅप्टन अमरिंदर सिंग यांना मुख्यमंत्री पदावरून हटविल्यानांतर चरणजीत सिंह

### सोनिया गांधींना लिहिले चार पानी पत्र



चन्नी हे मुख्यमंत्री झाले. त्यामुळे नवज्योत सिंग सिद्धू यांनी राजीनामा दिला होता. त्यांची मनधरणी करण्यात काँग्रेस श्रेष्टी यशस्वी झाले असून, सिद्धू यांनी त्यांचा राजीनामा मागेही घेतला. राहुल गांधी यांच्या भेटीनंतर पंजाब काँग्रेसमधील वाद मिटल्याचे बोलले जात होते. पण पंजाब काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असलेल्या सिद्धूंना आता काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांना पुन्हा पत्र लिहिले असून, सिद्धू यांनी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना भेटण्यासाठी वेळ मागितली आहे. त्यामुळे काँग्रेसचे संकट अजूनही कमी होण्याचे नाव घेत नसल्याचेच चित्र पहायला मिळत आहे. सिद्धू यांनी आता काँग्रेसवर निशाणा साधला आहे. दोन दिवसांपूर्वीच काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भेट घेतली होती. तेव्हा सिद्धू म्हणाले होते की, सर्व प्रश्न सोडवले गेले आहेत त्यामुळे मी समाधानी आहे. सिद्धू यांनी पंजाबचे नवनियुक्त मुख्यमंत्री चरणजीत सिंह चन्नी यांच्या काही निर्णयांवर नाराजी व्यक्त करत पंजाब काँग्रेसचे अध्यक्षपद सोडले होते. मात्र, चन्नी आणि इतर नेत्यांच्या समजुतीवर त्यांनी सहमती दर्शवली पान ७ वर

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

## पाहिजेत

दादर/कांजुरमार्ग (पूर्व) पी.स्क्वेअर पेस्ट कंट्रोल कंपनीत सेल्समन पाहिजेत. सकाळी ९ ते ७ (बुधवारी सुट्टी) पगार ९०००/- संपर्कः **9820548338 / 022 2477274** {NC210668}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (Thane) {NC210741}

HDFC बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भरती. 15000/- ते 35000. **7900137819** {NCC211118}

दुकान कामासाठी मुलगा - मुलगी पाहिजेत. पगार 10000 - 12000/- महोत्सव - महावीर डेकोरेटर्सच्या समोर, महाराणा प्रताप रोड, भाईंदर (वेस्ट) - **9323592346** {NC210738}

जिरे, मोहरी, धणे, सुगंधी उटणे पॅकिंग हप्त्याला 12000/- कमवा : **8425896515** {NC210759}

काजू, बदाम, चॉकलेट, सोडा , टिकली, अगरबत्ती, मेणबत्ती, ज्वेलरी पॅकिंग. : **7710018373** {NC210760}

टेक्सस इंडियासाठी पॅकिंग करण्याकरिता कामगार पाहिजे (दिवस /रात्र) स्त्री- पुरुष- . संपर्क: **7738750712/ 7700020719/ 9867409093** (पगार : 17500 रुपये) {NCC211208}

प्रायव्हेट लिमिटेड कंपनीसाठी मुले/मुली पाहिजेत. सुरुवातीला पगार 12500 - 22500 + बोनस + प्रॉव्हिडंट फंड (दादर) **9326069963** {NCC211123}

संपूर्ण मुंबईसाठी प्रमोशनच्या कामासाठी मुले/मुली/पुरुष / महिलाची आवश्यकता **8108106051** {NCC211174}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये पॅकिंग आणि कडी फिटिंग आणि सेटिंग करण्यासाठी मुली पाहिजे. दहिसर (पूर्व) - मोबाईल नं. - **8169999128** 12 ते 2 या वेळेत संपर्क करा. {NCC2111190}

हॉस्पिटल, रेल्वे स्टेशन, मार्केटमध्ये स्टॉलवर काम करण्यासाठी मुले, मुली, महिला पाहिजेत. रोज कमवा 500 ते 1000/- **8828990261 / 8591828756 / 7977505016** {NCC211205}

नामांकित कंपनीला ठाणे येथे हाऊसकिपर / प्लंबर / इलेक्ट्रिशियन, ट्राफिकवार्डन त्वरीत पाहिजेत. **8591972464** {NC210758}

ठाणे कंपनी माहिती प्रसारणसाठी मुले, मुली, महिला पाहिजेत कमवा. रोज 400 / 1200 रुपये **9987903347 / 8591811167** {NCC211216}

10/12/24 तास रुग्णसेवा वॉर्डबॉय, आयाबाई हवी **9892479607 / 8291152695** {NC210736}

टी. सी कंपनीत पॅकिंग कामासाठी दिवस-रात्री महिला / पुरुष पाहिजेत. वयाची अट नाही. १४५००/- - १९०००/- पगार. **7304048796, 7718022349, 9004035038** {NC210695}

## पाहिजेत

बोरीवली ते दादर, ठाणे ते चेंबूरपर्यंत वृद्ध पेशंटकेअर ड्युटीसाठी 12/24 तासासाठी (लस घेतलेले) वॉर्डबॉय, आया, नर्स पाहिजेत. आकर्षक पगार **9920463209** {NCC211187}

अधिकृत कंपनीचे सर्व्हेसाठी 15 मुला/मुलींची भरती आहे. पगार 10000/- - 13000/- + ४ महिन्यात प्रमोशन (शिक्षणाची अट नाही) कुर्ला (West), कल्याण (West) **9822300463 / 8689961642** {NC210756}

बँकेच्या कलेक्शनसाठी DRA / NON DRA टेलिकॉलर, फिल्ड एक्झिक्युटिव्ह, टिमलिडर्स पाहिजेत. पगार (12,000-30,000) 319, अनंत लक्ष्मी चेंबर, ठाणे (पश्चिम), **7045170449** {NCC211207}

पाहिजेत अंधेरी (पूर्व) आणि वसई (पूर्व), टर्नर/ मिलर / बेंच फिटर दूरध्वनी - **02226874914 / 02226870802** saimplmumbai@gmail.com {NCC210710}

ब्रॅन्डेड सॅनिटरी पॅडच्या होलसेल मार्केटिंगसाठी महिला (१०-३) काम. 10,000-12,000 + पास. दादर- **9820729815** {NCC211154}

**भांडूपयेथे अनुभवी Female Account Assistant पाहिजेत. Tally ERP-9 आवश्यक. संपर्क - दुपारी १ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत 9920269992 dirbaartspvtltd99@gmail.com** {NC210728}

वसईमधील प्रिंटिंग प्रेससाठी अनुभवी प्रिंटर, फिडरमन, बॉयलर, हेल्पर, पंचींग ऑपरेटर, बाईंडर, सुपरवायझर पाहिजेत. **8104738490** {NCC211186}

PVT. LTD. कंपनीत मुले-मुलींची अर्जंट भर्ती कमवा. 13,500 - 35,000/- राहणे फ्री + बोनस अंधेरी (West), **9967362303** {NCC211161}

सिक्युरिटी गार्ड / सुपरवायझर (MALE) 8-12 तास. पगार 16000-26000 **7738687772** {NCC211183}

घरी बसून लिखाण काम 7 दिवसांचा पगार 15000/- : - साक्षी **8591555848** {NC210740}

असिस्टंट लेथ मशीन ऑपरेटर पाहिजे. माटुंगा वेस्ट मुंबई. **9320177991 / 9223309898** {NC210763}

१०वी/१२वी मुले/मुली अनुभवी बिनअनुभवी ऑफिस असिस्टंट / रिसेप्शन / बॉडीगार्ड / शिपाई ताबडतोब पाहिजे. संपर्क - **7400033308** {NC210766}

कंपनीला परमनन्ट मुले-मुलींची भर्ती 18000/ - - 35000/- राहणे जेवण **8097795145** {NCC211218}

वैद्य मोटर स्कुटर ट्रेनिंग स्कुलमध्ये कामासाठी मुली पाहिजेत. वेळ सकाळी ७ ते सकाळी ९.३० मरीन लाईन्स स्टेशन (वे), वंदना - **9819331678, 9004262658** {NCC211217}

## पाहिजेत

अग्रगण्य कंपनीसह कोणत्याही लक्ष्य किंवा मुदतीशिवाय काम करण्याची उत्कृष्ट कमाईची संधी वय 30 आणि वरील **9004569425 / 9869014410** {NCC211219}

मालाड (ईस्ट) स्टेशन जवळ पुरुष / स्त्री टेलीकॉलर पाहिजेत. पगार ८-१० हजार पर्यंत. मराठी बोलायला सक्षम. वय ३० खाली. **9222222248** {NC210773}

असिन पॉवर प्रा. लि. ठाणे (इलेक्ट्रिकल बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टींग) कंपनीला अनुभवी उमेदवार पाहिजेत. इलेक्ट्रीकल (फ्रेशर/सिनिअर) इंजिनिअर आणि सुपरवायझर, सेफ्टी ऑफिसर, डिझाईन आणि प्लॅनिंग इंजिनियर. संपर्क : **8108105161 / 8425816604** {NC210774}

सुटिंग / शर्टिंग / रेडिमेड / साडीसाठी अनुभवी - बिनअनुभवी - सेल्समन/ सेल्सगर्ल पाहिजेत. तसेच तुमच्या सुट्टीच्या दिवशी काम करून पैसे कमवा. 'आनंद' रानडे रोड, पोस्टासमोर, दादर (वेस्ट). {NC210775}

Mechanical / production Engineer, Diploma Holder पाहिजेत. हिटर Thermostat कंपनीसाठी अनुभवी minimum 3 years. पत्ता - तुंगारफाटा (सातीवली), वसई (ईस्ट) **9112153568 / 9820229540** {NCC211220}

प्रभादेवीमध्ये 24 तास घरच्या कामाचा अनुभव आणि उत्तम आरोग्य असलेली महिला पाहिजे. वय ४० ते ५५ वर्षे आकर्षक पगार. संपर्क : अश्विन अगरवाल मो : **98210-98996** {NC210778}

ऑफिसमध्ये फोनवर हिंदी/मराठी बोलणारे मुले/मुली अर्जंट पाहिजेत. 8000-10000/- **(9930661023 / 9702621740)** {NC210776}

मसाले कंपनीच्या मार्केटिंगसाठी फायनांस कंपनीसाठी लेडीज ग्रॅज्युएशन / मुलगा बारावीपास पाहिजे. वांगणी (पूर्व), **9029892002 / 9076203123** {NCC211221}

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. पगार 18500 कल्याण, ठाणे, अंधेरी **9702063944** {NCC211222}

MIS सिक्योरिटीकरीता सिक्योरिटी गॉर्डची गरज पगार- सिक्योरिटी गार्ड -१७,०००/- वयोमर्यादा- ४० वर्षपर्यंत संपर्क- समीर खेडेकर - **9320644023** {NC210779}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७ वी नापास? डायरेक्ट १०वी. ११ वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली : **9820627580 / 9820904646** {NCC211181}

## Education

DO DIRECT SSC, HSC, BA, BCOM, BSC, BTECH, B.ED **9168088740** {NCC211209}

## जागा विषयक

बिल्डर रिसेल प्रॉपर्टी शेरिंग १००% लोन उपलब्ध एजन्ट वेलकम -**7715096161** {NC210714}

## व्यवसाय विषयक

सीएफएल/एलईडी बल्ब जोडणीचे काम करून १ लाखापर्यंत उत्पन्न मिळवा. - **8788254775, 9422850593** {NCC210686}

नवतरुणी तरुणांनो जॉब देणारे व्हा विविध वनऔषधी अग्रो इंडस्ट्रीत या. सिनियर सिटीजनानो प्रॉपर्टी घ्या सोबत पैसा दरमहिना मिळविण्यासाठी **8097641182 / 8999544225.** {NCC211206}

नवीन व्यवसाय सुरू करून दिवसा 2000/- कमवा. अनिरुद्धा - दादर - **8652643434** {NCC211170}

## कर्ज विषयक

LIC पॉलिसीवर ताबडतोब कॅश/कर्ज विसावा हॉटेलजवळ दादर (पश्चिम), सावंत - **9221357947** {NC210693}

दिवाळी स्पेशल सर्व प्रकारची कर्जे बिजनेस/पर्सनल/ हाऊसिंग लोन, कमी कागदपत्रे, कमी वेळेत त्वरित मिळतील. **7715968829** {NC210780}

## सर्विसेस

24, 12, 10 तास घरगुती काम, पेशंटकेअर, बेबीकेअर उपलब्ध / पाहिजे. 'स्मिताहाऊस सरवेन्ट एजन्सी' C-149 स्टेशन प्लाझा, भांडूप (पश्चिम) **8879385402, 8879288356** {NC210746}

## ज्योतिष विषयक

जोशी काका - धार्मिक पूजापाठ - हवन जन्मपत्रिका - लग्नयोग भेटा. संपर्क - **9967239033** {NCC211124}

''साईगणेश ज्योतिष मंगलपूजा सर्वप्रकारचे पूजापाठ कुंडली बनवून मिळतील. **7400240996** (भाईंदर) {NCC211212


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**मॅनेजर, 'नवाकाळ'**

# राशी भविष्य

**संजय मनोहर**

**सोमवार, दि. १८ ऑक्टोबर २०२१**

**मेष :** साचून राहिलेल्या कामांना गती मिळेल. ओळखीच्या व्यक्तीवर विसंबून राहू नये. प्रवास कार्यसाधक ठरतील.

**वृषभ :** जुन्या मित्रांच्या भेटीचा संभव आहे. नोकरीत विशिष्ट प्रकारची जबाबदारी घ्यावी लागेल. सत्संगाचा लाभ होईल.

**मिथुन :** भावंडे व नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. नात्यातील, व्यवहारातील जुनी उधारी वसूल होईल. कला, छंद जोपासाल.

**कर्क :** आवडत नसलेली माणसे व परिस्थितीत नको असलेले निर्णय घ्यावे लागतील. काहींना कमी श्रमात अधिक लाभ.

**सिंह :** कोणामुळे आपण तोंडघशी पडणार नाही, याची दक्षता घ्यावी. पैशाच्या व्यवहारात सडेतोड असावे. वाहने जपून चालवा.

**कन्या :** गैरसमजाने आपले नुकसान होऊ शकते. जुनी येणी प्रयत्नाने वसूल होतील. तरुणतरूणींना प्रेमप्रकरणात यश संभवते.

**तूळ :** पैशाची अडलेली कामे मार्गी लागतील. जोडीदाराकडून काही प्रमाणात फायदे संभवतात. प्रवास कार्यसाधक ठरतील.

**वृश्चिक :** लोकांच्या वागण्याबोलण्याचा अर्थ काढीत बसू नये. निर्णय घेऊन मोकळे व्हावे. शासकीय कामे मार्गी लागतील.

**धनु :** भिडस्तपणा नुकसान करवेल. अपेक्षित आर्थिक फायदे संभवतात. कलाकारांना पैसा व प्रसिद्धीचे योग.

**मकर :** तरुण तरूणींना वस्तुस्थितीस सामोरे जावे लागेल. थोडे हिशोबी राहाणे आवश्यक ठरेल. नातेवाईक अडचणी वाढवतील.

**कुंभ :** पैसा मिळेल, तसा खर्चही होईल. कोणाच्या आश्वासनावर दुसऱ्यास आश्वासन देणे टाळावे. जुनी गुंतवणूक फायदा देईल.

**मीन :** नोकरीत थोडा स्थितप्रज्ञ दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. मित्रमंडळींचे सल्ले फायद्याचे ठरतील. वैयक्तिक आरोग्य जपावे.

# मोहन भागवत १९ ते २१ दरम्यान अयोध्येला भेट देणार

**नवी दिल्ली-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत १९ ते २१ ऑक्टोबर दरम्यान अयोध्येला भेट देणार आहेत. या दरम्यान, संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसाबोले देखील अखिल भारतीय शारीरिक वर्गात सहभागी होण्यासाठी अयोध्येत त्यांच्यासोबत राहतील. मोहन भागवत अखिल भारतीय शारीरिक व्यायामाच्या वर्गात भाग घेतील आणि अयोध्येतील रामजन्मभूमीला भेट देऊ शकतात. व्यायाम वर्गात उपस्थित पदाधिकार्यांना भागवत राम मंदिराचा संदेश देऊ शकतात की आमच्या प्रयत्नांनी या देशात भव्य राम मंदिर बांधले जात आहे.अखिल भारतीय पदाधिकारी आणि संघाच्या भौतिक विभागाच्या सर्व ४५ प्रांतीय युनिट्सनेही कर्से वकपुरम येथील विश्व हिंदू परिषदेच्या स्थानिक मुख्यालयात व्यायामाच्या वर्गात सहभागी होण्याची अपेक्षा आहे. असोसिएशनचे सर्व वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमात सहभागी होतात. हे लक्षात घेण्यासारखे आहे की उत्तर प्रदेशातील ४०३ विधानसभा मतदारसंघांसाठी पुढील वर्षी लवकर निवडणुका होणार आहेत.



# रत्नागिरीतील आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योगपती गद्रे मरीनचे दीपक गद्रे

**रत्नागिरीतील** आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योगपती गद्रे मरीनचे दीपक गद्रे यांचा जन्म.१७ ऑक्टोबर. संगमेश्वर मध्ये राहणाऱ्या पण मुंबईतील सिडनहॅम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दीपक गद्रे यांनी स्वतःला आपल्या गावी राहून व्यवसाय करायचा आहे, हे पक्के ठरविले होते. पिठीजात किराणामालाचा व्यवसाय हे त्यामागचे आणि एक कारण. कॉलेजच्या सुट्टीत ते गावी जाऊन वडिलांच्या किराणा व्यवसायात नवे काहीतरी शिकत. मात्र, बीकॉम झाल्यानंतर त्यांची मन अन्य व्यवसायांच्या वाटा शोधू लागले. कोकणात आई-वडिलांजवळ राहून एखादा चांगला व्यवसाय करता येऊ शकतो का, याचा शोध घेत असताना, कोकणात मिळणारे मुबलक मासे त्यांना खुणावू लागले. पुढे हा मत्स्य अवतार यावर त्यांचे उद्योगसाम्राज्य उभे राहिले.

मत्स्य विक्री व्यवसायाचा काही अनुभव असल्याने त्यांनी मुंबईच्या फिश प्रोसेसिंग युनिटमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम केले. त्यावेळी टाटा ऑइल मिल्सचा फिशिंग विभाग रत्नागिरीतून ट्रक मधून कोळंबी मुंबईला प्रक्रिया करण्यासाठी घेऊन जात असे, दीपक गद्रे यांनी त्यांना रत्नागिरीतच फिनिश प्रॉडक्ट बनवून देतो, असे सांगितले आणि गद्य यांचा या व्यवसायात शिरकाव झाला. पाच वर्षाच्या अनुभवाने त्यांना मोठी उडी मारण्याचा आत्मविश्वास दिला. त्याच वेळी सरकारच्या पदवीधर बेरोजगार योजना त्यांना एमएसएफसी व सीकॉम अंतर्गत कारखाना काढण्यासाठी कर्ज मिळाले, बँका व अन्य व्यापार्यांच्या साह्यातून २५ लाख रुपयाचे कर्ज त्यांनी सुरुवातीस काढले काही रक्कम मच्छीमाराना दिली, मात्र बरेचसे पैसे अडकले.

आणि हे कर्ज पोहोचले तब्बल ६० लाखांवर तरी त्यांनी निग्रहाने व्यवसाय सुरू ठेवला चीनमध्ये रिबनफिशला खूप मागणी असल्याचे कळल्यानंतर त्यांनी या माशांच्या निर्यातीस सुरुवात केली. जाळ्यातुन कोळंबी सोबत येणारे पण टाकाऊ असणाऱ्या या माशांना परदेशी बाजारपेठ मिळाली. माशांची निर्यात सुरू असतानाच त्यांना सुरिमी गवसली. जपानी लोक माशांच्या पांढऱ्या रंगाच्या मांसापासून बनलेली सुरिमी वापरतात. ही सुरिमी म्हणजे आपल्याकडची तिंबलेली कणिक, जपानमध्ये हजारांहून अधिक पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सुरिमीची बाजारपेठ ओळखून त्यांनी १९९४ मध्ये भारतातला पहिला सुरिमी बनविण्याचा कारखाना उभारला. पूर्वी केवळ माशाचा ३० ते ३५ टक्के भाग वापरला जायचा. मात्र, आता माशाचा १०० टक्के भाग वापरला जातो. त्यामुळे, मत्स्यव्यवसायाला अमर्याद वाव आहे, असे गद्रे सांगतात. आता माशांचे मांसच नव्हे तर माशांची त्वचा, खवले आणि काड्यांपासून सौंदर्यप्रसाधने व सौंदर्यवर्धक औषधे बनतात. गद्रे मरीनमध्ये माशांच्या निर्यातीत कोळंबी शेती तसेच कोळंबी प्रक्रिया केली जाते. शिवाय त्यांनी बनवलेल्या माशांच्या विविध खाद्यपदार्थांच्या निर्यातीचा आकडा २५ हजार टनापर्यंत पोहचला आहे. त्यांची वार्षिक उलाढाल आहे ४२५ कोटी. गद्रे ब्रॅंडने आता देशभर मेट्रोसिटीमध्ये रेडी टू कूक अ‍ॅण्ड रेडी टू इट खाद्यपदार्थ दाखल केले आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्या कारखान्यात माशांवर प्रक्रिया करण्यासाठी वापरलेल्या पाण्यापासून इंधनही बनवले जाते. त्यातून निघालेल्या मिथेन वायूचा उपयोग बॉयलरमध्ये इंधन म्हणून केला जातो. शिवाय, माशांच्या अन्न टाकाऊ उद्यापासून उत्तम खत बनवले जाते.

त्यांचे सुपुत्र आणि गद्रे मरीनचे .. अर्जुन गद्रे यांनी १९९९ साली या व्यवसायात पदार्पण केल्यानंतर कंपनीने मत्स्यउद्योगात भारतातर्फे न भूतो.. अशी कामगिरी केली. १९९९ पासून गद्रे हेच भारतातर्फे मत्स्यपदार्थ निर्यातीत ट्रस्टेड ब्रँड आहेत. २००९ पासून सलग चार वर्षे बेस्ट एक्सपोर्ट परफॉर्मन्स, सर्टिफिकेट, सह विविध आंतरराष्ट्रीय सन्मान गद्रे मरीनने मिळवले आहेत.

सध्या गद्रे मरीनचे विविध प्रोडक्टस चीन, जपान, द कोरिया, मलेशिया, तैवान, ऑस्ट्रेलिया सह विविध देशात निर्यात होतात. रत्नागिरीतल्या गद्रे मरीन च्या कारखान्यातून सुमारे दीड हजार तरुणांना रोजगार मिळालाय. पहिल्यांदाच कोकणी चवदार मसाल्यांसह रेडी टू कूक मत्स्यपदार्थ बनविणाऱ्या गद्रे कंपनीने फ्रोझन (फिश) फूड्स क्षेत्रात अभूतपूर्व, आनंददायी आणि अल्पावधीत फार मोठी झेप घेण्याची अविश्वसनीय कामगिरी केली आहे. क्रॅब स्टिक्स, मसाला बांगडा, मसाला प्रॉन्स, फ्लेवर्ड फिशसह शेकडो मत्स्योत्पादने देशविदेशात खवय्यांच्या जिभेचे चोचले पुरवीत आहेत. केवळ व्यवसायिक यश हेच अंतिम ध्येय समोर न ठेवता दिपक गद्रे यांनी खूप मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य, विविध सामाजिक उपक्रमांना मदत, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी यांना सहाय्य केलं आहे, मात्र त्याची बातमी केली नसल्याने हे गुप्तदान सत्कारणी लागूनही प्रसिद्धीस पावले नाही. कला आणि क्रीडा क्षेत्रालाही दीपक गद्रे व अर्जुन गद्रे आणि एकूणच गद्रे मरीनने मोलाची मदत केली आहे.

**संजीव वेलणकर, पुणे**




**मुस्लिम** विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ व राजनीतिज्ञ सर सय्यद अहमद खान यांचा जन्म. १७ ऑक्टोबर १८१७ दिल्ली येथे.

त्यांचे पूर्वज हेरातचे. समाट अकबराच्या कारकीर्दीत त्यांचे पूर्वज भारतात स्थलांतरित झाले आणि मोगलांच्या दरबारात निष्ठेने सेवा करू लागले. त्यांच्या पूर्वजांना मोगल दरबारातून मानाचे किताब मिळाले होते. सर सय्यदांच्या वडिलांचे नाव सय्यद मुतक्की. मोगल दरबारात त्यांचे वजन होते. सय्यद अहमदांचे मातुल आजोबा ख्वाजा फरिदुर्शन अहमद हेही कर्तृत्ववान होते. मोगल दरबारात त्यांनाही सन्मान दिला जात होता. सर सय्यद यांना औपचारिक शिक्षण मिळालेले नव्हते. त्यांची आई हीच त्यांची पहिली गुरू होती. परोपकारी वृत्तीच्या या स्त्रीचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला होता. पवित्र कुराण, गुलिस्ताँ, बोस्ताँ यांसारखे फार्सी गंथ, काही अरबी गंथ ते निरनिराळ्या व्यक्तींकडून शिकले. गणित आणि भूमिती यांचाही त्यांनी अभ्यास केला. मिर्झा गालिब यांच्यासारख्या थोर उर्दू कवीचा निकट सहवास त्यांना लाभला आणि त्यांच्या काव्याने ते प्रभावित झाले. स्वतःची लेखनशैली सुंदर असली पाहिजे, याची जाणीव त्यांना झाली. १८३८ साली सर सय्यद यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर सर सय्यद यांनी मोगल दरबाराची सेवा करण्याऐवजी ईस्ट इंडिया कंपनीत काम करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला त्यांच्या आप्तांनी विरोध केला; तथापि हा विरोध भावनिक वृत्तीने केला जात होता. वास्तव वेगळेच होते आणि सर सय्यद यांना त्याची स्पष्ट जाणीव होती. मोगल समाटाची आर्थिक परिस्थिती अत्यंत ओढगस्तीची झालेली होती. दरबाराचे नोकर-चाकर सांभाळणेही कठीण झाले होते. वडिलांच्या निधनानंतर आपल्या आईला निवृत्तिवेतनही दिले जात नाही, हे सर सय्यद यांना दिसत होते. अशा परिस्थितीत मोगल दरबाराशी आपले भविष्य जोडणे, त्यांना योग्य वाटत नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीत त्यांना नोकरी मिळाली आणि आगा येथे नायब मुन्शी या पदावर त्यांची नेमणूक झाली. १८४१ मध्ये ते मैनपुरी येथे मुन्सफ झाले. सर सय्यद हे मोगल दरबारची नोकरी करीत नसले, तरी मोगल दरबारकडून त्यांना १८४२ मध्ये 'जवाद्-उद्-दौला अरिफ जंग' हा किताब देण्यात आला. १८४६ मध्ये सर सय्यद यांनी आपली बदली दिल्लीला करून घेतली. त्यांच्या वडीलबंधूंचे निधन झाल्यामुळे त्यांना दिल्लीत आपल्या आईच्या जवळ राहणे योग्य वाटत होते. त्या काळात त्यांची आर्थिक स्थिती बरी नसल्यामुळे त्यांनी पत्रकारिता आणि लेखन यांच्या आधारे आपल्या उत्पन्नात भर घालण्याचा प्रयत्न केला. त्यांचे वडीलबंधू एक पत्र चालवीत असत. ते त्यांनी हाती घेतले; पण त्यात त्यांना यश आले नाही. बिजनोर येथे सद्र अमीन या पदावर सर सय्यद यांची १८५५ मध्ये नेमणूक झाली. १८५७ चा उठाव झाला, तेव्हा कंपनी सरकारशी एकनिष्ठ राहून त्यांनी अनेक इंग्रजांचे प्राण वाचवले. तथापि या उठावामुळे इंगज सरकार मुसलमानांकडे संशयाने पाहू लागले होते. सर सय्यद यांच्या जवळच्या नातेवाईकांना, त्यांच्या आईलाही याची तीव झळ लागली. त्यामुळे देश सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात येऊन गेला. परंतु अखेरीस या परिस्थितीचा विचार त्यांनी मुसलमानांच्या संदर्भात केला आणि इंगजी सत्तेशी जुळवून घेण्यातच मुसलमानांचे हित आहे,या निष्कर्षाप्रत ते आले. १८५७ च्या उठावावर अस्बब-इ-बगावत-इ-हिंद (१८५९) हा गंथ त्यांनी लिहिला. त्यात त्यांनी बंडाची कारणमीमांसा केली. ती करताना त्यांनी इंगजांवरही टीका केली. बंडवाल्यांना शिक्षा देताना त्यांनी दाखविलेल्या सूडबुद्धीचा निषेध केला व या बंडात हिंदूंपेक्षा मुसलमान जास्त पोळले गेले, असेही मत व्यक्त केले. ब्रिटिश काउन्सिलमध्ये भारतीयांना प्रतिनिधित्व नसल्यामुळे भारतीय जनमताचे प्रतिबिंब त्यात पडत नाही आणि ब्रिटिशांचेच नुकसान होते, असेही प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर लॉयल मोहमेडन्स ऑफ इंडिया (१८६०) हे पुस्तक त्यांनी लिहिले. १८५७ च्या बंडाला सर्व मुसलमानांचा पाठिंबा नव्हता, असे दाखवून देण्याचा प्रयत्न त्यांनी या ग्रथात केला.

खिस्ती जमातीने जिच्याशी मैत्री करावी, अशी एकमेव जमात मुसलमानांची होय, असेही विचार त्यांनी ह्या गंथात मांडले होते. १८६७ मध्ये त्यांची बदली बनारसला झाली. १८६९ मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे यूरोपीय संस्कृतीचे त्यांना दर्शन झाले. त्या संस्कृतीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. इंग्लंडमधील वास्तव्यात त्यांना विख्यात स्कॉटिश साहित्यिक टॉमस कार्लाइल याचा स्नेहपूर्ण सहवास लाभला. प्रेषित मुहंमद पैगंबर यांच्या जीवनावर आणि सर सय्यद यांनी लिहिलेल्या एसेज ऑफ द लाइफ ऑफ मुहंमद (१८७०) ह्या पुस्तकावरही त्यांची चर्चा झाली. ऑक्सफर्ड आणि केंबिज विदयापीठांना त्यांनी भेट दिली. लंडनमध्ये दीड वर्षाहून अधिक काळ राहून सर सय्यद अहमद भारतात आले, ते अनेक शैक्षणिक योजना घेऊनच. ब्रिटिशांच्या शिक्षणविषयक धोरणाचा लाभ हिंदूंनी करून घेतला. याउलट हे शिक्षण आम्हाला नको, असे ठामपणे सांगणारा, आठ हजार मौलवींनी सह्या केलेला एक अर्ज मुसलमानांनी ब्रिटिश सरकारला सादर केला. मुसलमानांचे धर्मांतर घडवून त्यांना क्रिस्ती करणे, हा सरकारच्या इंगजी शिक्षणामागचा हेतू आहे, अशी त्यांची खात्री झाली होती. सर सय्यद ह्यांना मात्र शिक्षणसंस्था या आधुनिक इंगजी शिक्षणसंस्थांच्या धर्तीवर उभ्या केल्या जाव्या असे वाटत होते. इंगजी शिक्षणाला विरोध करून मुसलमान आपले नुकसान करून घेत आहेत, अशी त्यांची ठाम धारणा होती. आपले विचार मांडण्यासाठी त्यांनी फार्सी आणि इंगजी अशी दोन पत्रे काढली (तहसीब-अल्-अखलाक आणि मोहमेडन सोशल रिफॉर्मर). तथापि कट्टरपंथीय मुसलमानांनी 'काफिर', 'क्रिस्ताळलेला' अशी विशेषणे देऊन त्यांच्यावर टीका केली. सय्यद अहमद खान यांचे निधन २८ मार्च १८९८ रोजी झाले.

# जंजिरा खुष हुआ! रविवारी पर्यटकांची तुडुंब उपस्थिती

■ मुरुड जंजिरा, प्रतिनिधी

**कोरोना** लॉकडाऊन मुळे मुरुडचा प्रसिध्द जंजिरा जलदुर्ग कित्येक महिने बंद होता. आता जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला केल्याने येथील पर्यटन क्षेत्रात आलेली मरगळ दूर झाल्याचे शनिवारी ,रविवारी दिसून आले.रविवारी तर जंजिऱ्यावर हाजारोंच्या संख्येने पर्यटकांची तुडुंब उपस्थिती दिसत होती.एकदरा पूल आणि मुरूड बंदर मार्गावर पर्यटकांच्या वाहनांची प्रचंड कोंडी होत होती.खूप दिवसांनी पर्यटकांचे पाय लागल्याने जंजिरा देखील खुष झाल्यासारखे वाटत होते. मुरुडमधील व्यवसायीक देखील काहीसे सुखावल्याचे दिसत होते.

जंजिरा हाच मुरूड तालुक्यांतील पर्यटनाच्या वाटचालीतील महत्वाचा केंद्र बिंदू आहे हे आता स्पष्ट अधोरेखित झाल्याचे दिसून येत आहे.काशीद बीचवर नेहमीच पर्यटकांची मोठी वर्दळ असते. जंजिरा बंद असल्यास २१ किमी

## वाहनांची कोंडी

वरील मुरूड कडे फारसे पर्यटक फिरकत नाहीत असे जंजिरा खुला केल्यानंतर दिसून आले.मुरूड भागात एमआयडीसी नाही, रोजगार उपलब्ध होत नाही. सर्व आर्थिक बाबी पर्यटनावर बहुतांश अवलंबून आहेत. म्हणून येथील बचत गट, हॉटेलिंग, लॉजिंग, घरगुती निवास, भोजन आदी पर्यटन व्यवसायाकडे वळले आहेत. मुरूड मधील पर्यटन स्थळे, विकसित झाली किंवा खुली झाली तर पर्यटन व्यबसाय सुरळीत सुरू राहतो. कारण सातत्य फार महत्त्वाचे आहे. जंजिरा इतके दिवस बंद असल्याने येथील स्थानिकांचे जबरदस्त नुकसान झाले आहे.मुरूड तालुक्याचा विचार केला तर काशीद बीच, साळाव येथील गणेश मंदिर, फणसाड अभयारण्य, नांदगांव येथील श्री सिद्धविनायक देवस्थान,मुरुडचा प्रेक्षणीय राजवाडा, दत्त मंदिर, ईदगाह, गारंबी आणि आंबोली धरण, प्रशस्त समुद्र किनारा, नांदगाव येथील समुद्र किनारा, विकसीत होणारे आगरदंडा बंदर असे खूपसे आहे, परंतु पर्यटकांना हे माहिती असेलच असे ठाम सांगता येत नाही. त्यामुळे पर्यटक मुरूड मध्ये स्थिर राहत नाहीत, अशी माहिती मिळाली. या सर्व स्थळांची माहिती सर्वदूर पोहचली पाहिजे तरच पर्यटक स्थिरावतील असे वाटते.


निकाल **गणेशलक्ष्मी वैभव** विकली लॉटरी — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 5:00

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 34 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 17/10/2021

| बक्षिस | जिंकले | विक्रेता |
| --- | --- | --- |
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG00 : 5714 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2962 (रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली) | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली: न्यू जय अंबे लॉटरी भंडार - यवतमाळ (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1395 (रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली) | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली: महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2098 (रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली) | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली: मातोश्री एन्टरप्रायझेस - खामगाव (5 बक्षिसे) |

सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी

पाचवे बक्षिस रु. 400/- सर्व मालिकांसाठी — पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | 2285 | 3228 | 3876 | 4374 | 4844 | 5856 | 6639 |
| | | 2340 | 3234 | 3947 | 4416 | 5085 | 5921 | 6642 |
| | | 2493 | 3309 | 4084 | 4444 | 5262 | 5980 | 6650 |
| | 1586 | 2692 | 3327 | 4121 | 4465 | 5293 | 6150 | 6667 |
| 1133 | 1703 | 2826 | 3423 | 4194 | 4482 | 5350 | 6162 | 6708 |
| 1192 | 2020 | 2966 | 3633 | 4227 | 4571 | 5417 | 6200 | 6894 |
| 1470 | 2023 | 2972 | 3642 | 4340 | 4747 | 5563 | 6287 | 6915 |
| 1547 | 2025 | 3040 | 3733 | 4345 | 4764 | 5697 | 6385 | 6956 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# राज ठाकरेंच्या नावे खंडणी मागण्याचा प्रकार मराठी चित्रपट निर्माते-दिग्दर्शकाला अटक

■ मुंबई

**मुंबई** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नावाने खंडणी मागण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल होताच मालवणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. धक्कादायक म्हणजे अटक करण्यात आलेल्यांमध्ये सिनेसृष्टीतील तिघांचा समावेश आहे. दिग्दर्शक मिलन वर्मा, निर्माता युवराज बोऱ्हाडे आणि चालक सागर सोलनकर यांना याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.



या प्रकरणात पोलिसांनी एका मराठी अभिनेत्रीलाही नोटीस बजावल्याचे सांगितले आहे. आरोपींनी मुंबईतील मड परिसरातल्या एका बंगल्याच्या सुरक्षा रक्षकाला मारहाण केली आणि याचा व्हिडिओ व्हायरल केला.

व्हायरल झालेल्या व्हिडीओत एक महिला राज ठाकरेंचं नाव घेत एका सुरक्षारक्षकाला मारहाण करत आहे. राज ठाकरेंना तू ओळखत नाहीस का? काम कोणासाठी करतोस आणि महाराष्ट्रात, मुंबईत कसा राहतोस? असे सवाल करत आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी मालवणी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक अनुराग दिक्षीत यांनी माहिती दिली आहे. सुरक्षारक्षकाच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून यातल्या महिलेला पोलीस ठाण्यात बोलवण्यात आलं होतं. मात्र ती रात्री आली नाही, म्हणून तिला आता पुन्हा एकदा नोटीस बजावण्यात आली आहे.

# तिरोड्यात कोळशाच्या भरधाव ट्रकची दुचाकीला धडक! मुलगा ठार, आई गंभीर

■ गोंदिया

गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा शहरात आज रविवारी सकाळी दहा वाजता कोळसा वाहून नेणाऱ्या ट्रक चालकाने विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीला समोरून जोरात धडक दिल्याची घटना घडली.

या धडकेत दुचाकी वाहनावरून जाणाऱ्या मायलेकरांपैकी मुलाचा मृत्यू झाला तर आई गंभीर जखमी झाली. संबंधित महिलेवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहे.

गोंदिया शहराच्या मुर्री भागात राहणारा प्रितेश डोहरे आणि त्याची आई दुचाकी वाहनाने भंडारा जिल्ह्यात जाणासाठी निघाले असता समोरून येणाऱ्या ट्रक चालकाने प्रितेश यांच्या दुचाकी वाहनास धडक दिली.

ट्रकच्या मागील चाका खाली येऊन प्रीतेशचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्याची आई यशवंता डोहरे या गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान ट्रक चालकाला तिरोडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# दौंडमध्ये दरोडा सत्र! पोलिसाला जबर मारहाण करून घर लुटले

■ पुणे

**दौंड** शहर आणि परिसरात दरोडेखोरांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. त्यात पाच दरोडेखोरांनी भल्या पहाटे गोपाळवाडी रोड परिसरातील भवानीनगर, गजानन सोसायटी आणि शिवाजीनगर येथे ३ घरांवर दरोडा टाकला. यातील इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे दौंड पोलीस ठाण्याचे नाईक अण्णासाहेब देशमुख यांच्या बंगल्यात घुसून त्यांना मारहाण करून घर लुटले. या प्रकारामुळे संपूर्ण परिसरातील नागरिकांमध्ये



भीतीचे वातावरण पसरले आहे.

गेल्या काही दिवसांपासून दौंड आणि इंदापूर परिसरात दरोड्यांचे सत्र सुरू आहे. त्यात शनिवारी पहाटे त्यांनी या परिसरात काही घरांवर दरोडे घातले. यात दौंड पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक अण्णासाहेब देशमुख यांच्या बंगल्यावर पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास दरोडा टाकला.

त्यावेळी त्यांनी देशमुख यांना जबर मारहाण करून घरातील पैसे आणि दागिने लुटले. चक्क पोलिसांच्याच घरावर अशाप्रकारे धाडसी दरोडा पडल्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे हा दरोड्यांचा प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. त्यामुळे त्यांना लवकरच अटक करण्यात यश येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला.

# हिरकणी जिवंत राहण्यासाठी शुभांगी हुतात्मा झाली...

**शिवरायांच्या स्वराज्याची राजधानी सातारा. इथली मूठभर माती ग्लासभर पाण्यात ओतली तर तवंग येईल तो रक्ताचा. अश्या मातीतल्या ९ तरुणी ९ दुर्गा महोत्सवासाठी नटल्या मुरडल्या नाहीत तर तोंड हेल्मेटमध्ये कोंबून निघाल्या. साडे तीन शक्ती पीठांच्या दर्शनाला. म्हणजे काय त्या देवभोळ्या होत्या का तर नाही. त्यांच्यात जाण होती स्त्रीशक्तीची. त्यांना जाण होती की भररस्त्यावर अपघातात मृत्यु जाताहेत याची...... यातूनच साताऱ्याच्या लेकींनी साडे तीन खंड पीठांना गाऱ्हाणं घालण्यासोबत 'रोड सेफ्टी' या सोबत महिलांच्या 'ब्रेस्ट कॅन्सर' बाबत जनजागृती करण्याची मोहीम आखली. रस्त्यावर क्रूरतेने ज्या गाड्या धावतात त्यांच्या विरोधात हे बंड होतं. जिनं आरव्वा रायगड रात्रीत उतरला त्या हिरकणीच्या नावानं हे बंड पुकारलं गेलं. मात्र 'हिरकणी जिवंत राहावी म्हणून माझी शुभांगी हुतात्मा झाली'**

• **दीपक प्रभावळकर**, सातारा

नांदेडच्या एका फाट्यावर हे आरुण्यरुदन घडलं आणि
सुरू झालाय एक नवा ऐलान !
सुरू झालीय एक जंग !!
शुभांगी हुतात्मा झाली
म्हणजे
शुभांगी संपली का?

नाही ती पण संपली नाही आणि राईड पण संपली नाही. कारण साताऱ्याची माती अजून इतकी फिक्कट झाली नाही. आता पुन्हा ती देश काबीज करेल ती अशी आणखी कणखर बनतेय आहे.

साताऱ्यातल्या मनीषा फरांदे, अंजली शिंदे, मोनिका निकम-जगताप, शाबानी बॅनर्जी, भाग्यश्री केळकर, ज्योती दुबे, अर्चना कुकडे, केतकी चव्हाण या लेकींनी रोड सेफ्टी आणि ब्रेस्ट कॅन्सर याकडे लक्ष वेधण्यासाठी रॅली काढण्याचा संकल्प केला. यातली एकही पोरगी माझ्या ओळखीची नव्हती. जेंव्हा भेटल्या तेंव्हा यांचा हेतू शुद्ध वाटला. मग काय या माझ्या पोरींच्या पाठीमागे उभं राहायचा म्हणून मनोमन निर्णय केला.

पोरींनो, 'हा केवळ तुमचा विषय नाहीये हा सामाजिक हेतू आहे यात समाजाला आणलं पाहिजे,' हा माझा मुद्दा मी पोरींच्या माथी हाणला. नंतर अनेक बैठका माझ्यासोबत झाल्या आणि त्यातून निर्माण झाली

'शक्ती राईड'

कोल्हापूरची आंबाबाई, तुळजापूर, माहूरगड, वणी असा सगळा प्रवास सुमारे २,००० कि.मी. चा ठरला.

हे माझ्या पोरीला पोरी जोडत गेल्या आणि ९ रात्रीला माझ्या ९ हिरकणी जमल्या.

काय ती मैत्री, काय ते बंधन.

कधी सख्ख्या बहिणी इतक्या घट्ट झाल्या नसतील अश्या या पोरींच्या कुटुंबात मला विनाकारण जेष्ठ केलं गेलं. यातली शुभांगी म्हणजे एका वाक्यात सांगायचे झाले तर 'शुभांगी म्हणजे संभाजी पवारची बायको'. आता सातारचा संभाजी पवार हा महाराष्ट्राला माहीत असलेला रायडर. मग बायकोत तेच गुण उतरलेले. शुभांगी पण तशीच बाईक रायडर. म्हणूनच या 'शक्ती रायडर' सोबत ती जोडली गेली.

बघा ना देवानं सुखं देताना पण एकाच वेळी दिली. जान्हवी आणि अथर्व अशी तिची ( वय २० ) दोन मुलं यांच्या संगोपनात तसूभरही कमी पडू न देणारी शुभांगी -जड आर्ट ऑफ लिव्हिंग शी खूप नितांत जोडली गेली होती. न पाहिलेल्या देवांवर आपण विश्वास ठेवतो पण श्री श्री रविशंकर हा तिचा देव तिने पहिला होता.

नवऱ्याची साथ, देवाचा आशीर्वाद आणि मैत्रिणीच्या सोबतीने तिने श्री छ. उदयनराजे यांच्या फ्लॅग ऑफ ने गाडीला किक मारली. या राईडला कराडला सौरभ पाटीलने तर कोल्हापूरला मनोज साळुंखेसह माझ्या टीमने सन्मानित केलं. पुढे तुळजाभावनिच्या मंदिरात या पोरींचा थाटात सन्मान झाला. मुक्काम करून मुली पुढे निघाल्या होत्या भली पहाट ओलांडून आता सुरुकिरण स्पष्ट दिसत होती. आमच्या लेकी मात्र जगभरातल्या सगळ्या सेफ्टी नॉर्मस पळून एका रेषेत होत्या. इथं काय नऊवारी घालून फोटोसेशन करायचं नव्हतं तर इथं सेफ्टी नॉर्म पाळण्याचे धडे द्यायचे होते म्हणून पोरींनी नाकात नथ नसेल घातली पण डोक्यात हेल्मेट घातलं, नऊवारी नाही घातली तर टाईट जीन्स घालून वर नी-गार्ड घातलं होतं.....

प्रवासांत नांदेड शहर आलं ते ओलांडत असताना त्यांचा माहूर फाटा आला की जो जिल्ह्यात अक्सीडेंट स्पॉट म्हणूनच प्रसिद्ध आहे.... याच स्पॉटला, याच क्षणी जे घडलं ते यापुढे रोड सेफ्टींच्या संदर्भाने अजरामर करण्यासाठी माझ्यासह तुम्ही प्रत्येकाने झटलं पाहिजे..... कारण इथंच हिरकणीला जिवंत ठेवण्यासाठी आमच्या साताऱ्याची लेक शुभांगी पवार हुतात्मा झाली.....! आणि पुन्हा एकदा हिरकणी हा विचार अजरामर झाला.

एक भरधाव ट्रक येतो काय आणि सेफ्टी नॉर्म चालणाऱ्या दुचाकी स्वारला उडवून - चिरडून जातो काय? हेच विदारक सत्य मांडण्यासाठी शुभांगी निघाली होती. या क्षणाला ती हुतात्मा झालीय हे सांगतानाचं जड अंतःकरण व्यक्त नाही करता येत. तिला 'हुतात्मा' म्हणताना मी शाहिद आणि हुतात्मा या शब्दांसाठी १० वर्ष खर्ची घातले आहेत, हे माहीत असू दे. कराची हायकोर्टचा निकाल झाल्यानंतर याचा विस्तार केलाय. 'देश रक्षणासाठी जो बळी जातो तो हुतात्मा' ही साधी व्याख्या. आणि रोड सेफ्टी हा देशरक्षणाचाच विषय बनलाय.

शुभांगी गेलीय, हे डोळ्या देखत पाहताना बाकी ८ पोरींनी जी हंबरडा फोडला तो आसमंत भेदून जाणारा होता.

हो

कारण त्यांचा पहिला फोन मला आलेला कोणीच काही बोलत नव्हते फक्त आक्रोश होता, माझ्या कानात झिणझिण्या होत्या. याच आक्रोशात एक वाक्य कळलं

'शुभांगी ट्रकनं चिरडून गेलीय'

यापुढे पोरींचे १५/२० फोन झाले पण एकीला पण एकही वाक्य बोलता येत नव्हतं. दुनियेभरचा सारीपाट माझ्यापुढ्यात मांडला गेलेला.

मग पुढे किमान ५०० फोन झाले असतील त्यातून नांदेडचा पत्रकार मित्र दीपक एमरवार, पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, जिल्हाधिकारी विपीन इटकर, सेनेचे आमदार बालाजी किणीकर अश्या सह शेकडो लोकांना इथं उभं केलं. कौस्तुभ फरांदे हे नांदेडचे उद्योजक मोठ्या धैर्याने कामी आले. सगळे सोपस्कार कामी आणता आले. एक गाडी जी शुभंगीला घेऊन येईल

दुसरी गाडी जी ८ पोरींना आणेल

तिसरी गाडी जी त्यांच्या बाईक आणेल मग झालं की.

पण हे काम, ही राईड, शुभांगीची अखेरची इच्छा इथं संपली नाही

तर ती इथून पुढे सुरू झाली आहे. आकंठ आक्रोशात बुडालेल्या साताऱ्याचा पोरींनी काळजावर दगड ठेवत निर्णय घेतला की, या पुढे ही शुभांगी राईड असेल आम्ही जे तिला अपेक्षित होतं तेच पूर्ण करून येणार आहोत.' पण

बाईचं जीवन कधी तिचं एकटीचं असतं, नवरा-पोरं-गोतावळा असतो ना तिच्या मागे.....

त्याच गोतावळ्याच्या आग्रहाखातर आमच्या पोरी परत येताहेत. पण राईड अर्धी सोडून नव्हे.... पूर्ण विराम घेऊन नव्हे. हा केवळ स्वल्प विराम असेल.

शुभांगी गेली नाही आणि तिला आम्ही जाऊ देणार नाही. जिला बाईकवर टांग टाकून बसायला शिकवणारा खणखणीत संभाजी आहे, माझ्या बाकी पोरी आहेत, साताऱ्याच्या मातीचा रंग गडद आहे तोवर कधीच शुभंगीला जाऊ देणार नाही......!

शुभांगी तुझं नवं आयुष्य आम्ही पुन्हा त्याच फाट्यावरून सुरू करणार आहोत. बाकी पोरी माझ्या सोबत आहेतच.

तू फक्त अशीच सोबत राहा.
तुझा कोणीच नसलेला
दीपक प्रभावळकर.

# डहाणू शहरातील राज्यमार्गावरील खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत! नगराध्यक्षांनी केली मागणी

■ डहाणू, प्रतिनिधी

**डहाणू** नगरपरिषद हद्दीतील डहाणू शहरातील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असणाऱ्या, राज्यमार्गावर पावसाचे पाणी रस्त्यावर येऊन पडलेले मोठ-मोठे खड्डे,तात्काळ बुजविण्यात घ्यावेत,अशी मागणी खुद्द नगराध्यक्ष भरतसिंग राजपूत यांनी सा.बा.खात्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. या वर्षी पडलेल्या पावसाने, डहाणू शहरातील रस्ते जवळजवळ रोजच पुराच्या पाण्याखाली जात होते, त्यामुळे भर रस्त्यावर पुराचे पाणी साचून, डहाणू रोड, मल्याण, पारनाका, ईराणी रोड, थर्मल पावर रोड,



सागरनाका, रामवाडी, सरावली, आगर, डहाणू बोर्डी रोड, या ठिकाणच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत.

या खड्ड्यात वाहनांचे नेहमीच अपघात घडत असतात, तसेच वाहनांमुळे खराब पाणी उडून अनेकांचे कपडे खराब होत असतात,याकडे स्थानिक आमदार काहीच लक्ष देण्यास तयार नाहीत, शहरात नगर परिषद असली तरी, शहरातील मुख्य राज्यमार्ग रस्ते हे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत आहेत, मात्र सा.बा. खात्याकडे रस्ते दुरुस्ती देखभालीसाठी निधी उपलब्ध नाही,अशी तकलादू कारणे देऊन ते खड्डे बुजविण्या कडे लक्ष देण्यास तयार नाहीत, डहाणू नगरपरिषद देखील स्वभांडवला तून खड्डे बुजविण्या एवजी, सा.बा.खात्याकडे बोट दाखवीत असतात. त्यामूळे राज्य मार्गावरील खड्डे तिघांच्या कैचीत सापडले आहेत. त्यामुळे खुद्द नगराध्यक्ष भरतसिंग राजपूत यांनी, सार्वजनिक बांध काम खात्याकडे हे खड्डे तत्काळ बुजविण्याची मागणी केली आहे.

# सिंहगडावरील मालुसरे उद्यान परिसरात बिबट्याचा वावर! घाटाचा वापर टाळा

■ पुणे

**सिंहगड** घाटात मालुसरे उद्यान परिसरात बिबट्याचा वावर असल्याची माहिती स्थानिक नागरिक व पर्यटकांनी उपद्रव शुल्क नाक्यावर दिली आहे. त्यानंतर सिंहगड जंगलात वन्यजीव आहेत. संध्याकाळी पर्यटकांनी घाटाचा वापर टाळावा. लवकर निघून यावे असे आवाहन वन विभागाने केले आहे.

गोऱ्हे बुद्रुक येथील युवक सुधीर खिरीड याने याबाबत सकाळ ला माहिती देताना सांगितले की, शनिवारी संध्याकाळी साडेसहा वाजता खेड शिवापूर वरून सिंहगड घाट रस्त्याने घरी दुचाकीने येत होतो. सोबत माझ्या दोन दोन लहान मुले होती. नरवीर तानाजी मालुसरे उद्यानच्या पुढे,अकरा हजार



पॉइंटच्या पुढे दुसऱ्या वळणावर बिबट्या रस्त्यावर चालताना दिसला. अंधार पडत होता. अगोदर लांडगा किंवा तरस असेल वाटले. पण दुचाकीच्या हेडलाईटच्या उजेड होता. बिबट्या असल्याची मला खात्री झाली. जागेवरच मी गाडी थांबवून गाडीची लाईट कमी जास्त केली. आणि माझ्या मागे एक मोटार होती. तिची उजेडात बिबट्या आणखी स्पष्ट दिसला बिबट्याने मागे न पाहता उजव्या बाजूला झाडीमध्ये शांतपणे निघून गेला. मग मी फोर मोटारीच्या कडेने खालीपर्यंत आलो. खाली येऊन उपद्रव शुल्क नाक्यावरील वन संरक्षक कर्मचाऱ्यांना माहिती दिली. तेव्हाच आणखी दुचाकी चालकांनी तेथे आले आणि त्यांनी सुद्धा बिबट्या पाहिला असे सांगितले.

# गुरांचे बाजार बंद! पशुपालकांनी भरवला रस्त्यावर बाजार! पोलीस आल्यानंतर पळापळ



■ चाकण, प्रतिनिधी

**प्रशासनाने** गुरांचे बाजार बंद ठेवण्याचे आदेश दिलेले आहे. मात्र तीन आठवडे होऊनही गुरांचे बाजार सुरु करण्यात न आल्याने पशुपालक शेतकऱ्यांनी आणि व्यापार्यांनी चक्क रस्त्यावर पहाटेपासून गुरांचा बाजार भरवला होता. कुठल्याही प्रकारचे नियोजन नसताना भरलेल्या या बाजारामुळे चाकण ते रोहकल - पिंपरी दरम्यानच्या रस्त्यावर पहाटेपासून मोठी गर्दी उसळली. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यानंतर बाजारात गुरे घेऊन आलेल्या पशुपालक शेतकरी आणि व्यापाऱ्यांची चांगलीच पळापळ झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. जिल्ह्यातील पशुधनास लाळ खुरकुत रोग व सांसर्गिक गर्भपात रोगाची लागण झपाट्याने वाढत असल्याने सदर रोगाचा प्रादुर्भाव आटोक्यात येई पर्यंत जिल्ह्यातील जनावरांचे सर्व बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिलेले आहेत. त्यामुळे चाकणसह जिल्ह्यातील सर्व जनावरांचे बाजार २ ऑक्टोबर पासून पुढील आदेश येई पर्यंत बंद ठेवण्यात आले आहेत.

तीन आठवडे बाजार बंद असल्याने अखेर पशुपालकांच्या संयमाचा बांध फुटला. शनिवार हा चाकण मधील आठवडे बाजाराचा दिवस असल्याने अनेक पशुपालकांनी शेळ्या-मेंढ्या येथे खरेदी-विक्रीसाठी आणल्या होत्या. गुरांचा बाजार बंद असल्याने रोहकल रस्त्यावरील मार्केटच्या गुरांच्या बाजारापासून काही अंतरावर चक्क रस्त्यावर हा बाजार पहाटेपासून भरला. त्यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी झाली. या बाबतची माहिती मिळाल्यानंतर सकाळी नऊच्या सुमारास घटनास्थळी पोलीस आल्यानंतर पशुपालक शेतकऱ्यांनी आपापल्या गुरांसह येथून काढता पाय घेतला.

# जात प्रमाणपत्र पडताळणीतील उपायुक्ताला लाच घेताना अटक

■ पुणे, प्रतिनिधी

**पुणे** लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने मध्यरात्री पुण्यात मोठी कारवाई करत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य आणि उपआयुक्त नितीन ढगे यांना १ लाख ९० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे. या कारवाईने खळबळ उडाली आहे. नितीन चंद्रकांत ढगे (४०) असे पकडण्यात आलेल्या उपआयुक्त यांचे नाव आहे.

याप्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितीन ढगे हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागात उपआयुक्त आहेत. तसेच ते जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य देखील आहेत. दरम्यान यातील तक्रारदार यांच्या पत्नीचे जात प्रमाणपत्र पडताळणी करून ते वैध करण्यासाठी त्यांनी जिल्हा जात पडताळणी कार्यालयात अर्ज केला होता. त्यावेळी लोकसेवक नितीन ढगे यांनी

**१ लाख ९० हजार रुपयांची लाच**

त्यांच्याकडे ८ लाख रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदार यांनी एसीबीकडे तक्रार केली होती. त्याची पडताळणी करण्यात आली. त्यात ३ लाख रुपयांची लाच मागण्यात आली. त्यानुसार मध्यरात्री सापळा कारवाईत तडजोडीअंती १ लाख ९० हजार रुपयांची लाच घेताना एसीबीच्या पथकाने त्यांना अटक केली आहे. राहत्या घराजवळ ही कारवाई करण्यात आली आहे.

# कांद्याची आवक घटली! भावात वाढ एकूण उलाढाल १ कोटी रुपये

■ चाकण, प्रतिनिधी

**खेड** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये कांद्याच्या आवकेत घट होऊन भावात आणखी वाढ झाली. पालेभाज्यांच्या आवकेत मोठी घसरण झाल्याने भावात मोठी वाढ झाली. हिरवी मिरची व टोमॅटोचे भाव या आठवड्यात तेजीत राहिले आहेत. बटाट्याची आवक घटून भावातही घसरण झाली. लसणाची आवक घटूनही भाव स्थिर राहिले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार गुरांचे बाजार सलग तिसऱ्या आठवड्यात बंद होते. एकूण उलाढाल १ कोटी रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ८०० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक २०० क्विंटलने घटल्याने भावात वाढ झाली. कांद्याचा कमाल भाव ३,००० रुपयांवरून



३ हजार, ५०० रुपयांवर पोहोचला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक १,००० क्विंटलने घटली. बटाट्याचा कमाल भाव १,५०० रुपयांवरून १,४०० रुपयांवर स्थिरावला. जळगाव भूईमुग शेंगां व बंदूक शेंगाची काहीच आवक झाली नाही. लसणाची एकूण आवक १८ क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक २ क्विंटलने घटून भाव स्थिर राहिले. लसणाचा कमाल भाव ८ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३५ क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ३४५ क्विंटलने घटली. हिरव्या मिरचीला ६,००० ते ८,००० रुपये भाव मिळाला.

शेतीमालाची एकूण आवक व बाजारभाव पुढील प्रमाणे -

कांदा - एकूण आवक - ८०० क्विंटल. भाव क्रमांक १. ३,५०० रुपये, भाव क्रमांक २. २,८०० रुपये, भाव क्रमांक ३. २,००० रुपये.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥



# कोरोना आणि दुर्लक्षित वैद्यकीय क्षेत्र

**सुरक्षिततेचे** किती वेगवेगळे पैलू असू शकतात हे कोरोना महामारीच्या निमित्ताने प्रकर्षाने समोर आले आहे. सुबत्ता असली तरी सुरक्षितता मिळेलच. याची खात्री देता येत नाही. कारण आर्थिक किंवा भौतिक साधनसंपत्ती ही मनुष्याला किंवा समाजाला सर्वार्थाने सुरक्षित करू शकत नाही. हीदेखील वस्तुस्थिती आहे. असलेल्या साधनसंपत्तीचा विनियोग मनुष्यजीवनाच्या सुरक्षिततेसाठी करता येणं हे किती महत्त्वाचे आहे. हा दुर्लक्षित पैलू कोरोनामुळे सगळ्यांच्याच लक्षात आलेला आहे. अमेरिकेसारखा सर्वशक्तीमान देश कोरोनाची लाट रोखू शकला नाही. एवढेच नव्हे तर सर्वाधिक प्राणहानीची झळही त्या देशाला सोसावी लागली. याउलट भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशाने मनुष्याच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले. अपुऱ्या, तुटपुंज्या वैद्यकीय सोयीसुविधांमधून अधिकाधिक लोकांचे प्राण वाचावे म्हणून प्रयत्न केले तरीसुध्दा जी काही हानी झाली. ती चिंताजनक आणि दुर्दैवीच होती. एकूणच मानवी इतिहासामध्ये कोरोनाची महामारी ही अभूतपूर्व राहिली. असे काही घडू शकते यावर लोकांचा विश्वास नव्हता. परंतु अशा पध्दतीचे संकट येऊ शकते. आणि ते कोणत्याही स्वरूपाचे नुकसान करू शकते. असाही एक विलक्षण अनुभव सर्वांना आला. जगातल्या इतर देशांनी या सगळ्या महामारीतून काय धडा घेतला हा त्यांचा त्यांचा प्रशासनिक आणि राजकीय विषय असला तरी भारतासारख्या देशाने मात्र खूप मोठा धडा घेण्याची गरज आहे. या महामारीत या पध्दतीचे नुकसान झाले. ते जर भविष्यकाळात टाळायचे असेल तर बऱ्याच वेगवेगळ्या घटकांचा आणि मुद्द्यांचा विचार होऊ शकतो. अर्धवट आणि अपुऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे भारतात अनेकांचे प्राण गेले ही वस्तुस्थिती आहे. अनेक दवाखान्यांमध्ये डॉक्टरांची इतर आरोग्य कर्मचाऱ्यांची प्रचंड कमतरता भासली. सरकारी रुग्णालयांच्या कमतरतेमुळेसुध्दा योग्य ती वैद्यकीय मदत वेळेवर उपलब्ध झाली नाही. ऑक्सीजनचा अपुरा पुरवठा, रेमेडिसिवरसारख्या इंजेक्शनबाबतचा सावळा गोंधळ त्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना करावी लागलेली धावपळ अनेक खाजगी रुग्णालयांनी केलेली प्रचंड लूट तिथेसुध्दा सोयीसुविधांचा मोठा अभाव, तज्ञ, प्रशिक्षित , डॉक्टरांचा प्रचंड तुटवडा ही कोरोनाच्या काळात जाणवणारी महत्त्वाची गोष्ट ठरली.

### पूरक गोष्टींची पूर्तता

संपूर्ण देशभरामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात दवाखाने उपलब्ध नाहीत. डॉक्टरांची संख्या अत्यंत तोकडी आहे. आजही ग्रामीण भागात तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. प्रशिक्षित पारिचारिका, रेडिओलॉजिस्ट, एक्स रे टेक्निशअन, पॅथोलॉजिकल लॅबोरेटरीज, थेरपिस्ट, मिळू शकत नाहीत. बऱ्याच जीवनरक्षक औषधांची निर्मिती भारत स्वतंत्रपणे करू शकत नाही. कोव्हॅक्सीन किंवा कोविशिल्ड या औषधांची निर्मितीसुध्दा पूर्णपणे भारतीय स्वरूपाची नाही. त्यासाठी अन्य देशांची मदत घ्यावी लागली. याचाच अर्थ औषधी निर्मिती क्षेत्रात आपण पूर्ण आत्मनिर्भर आहोत असे म्हणता येणार नाही, ही गोष्ट खरी की भारतात कोरोनाच्या काळात औषध निर्मिती पुरेशा प्रमाणात झाली. आणि जगातील काही देशांना औषधे पुरवली गेली. परंतु ऐंशी टक्के खेड्यात राहणारा भारत मूलभूत वैद्यकीय सुविधांपासून वंचित आहे हे नाकारता येणार नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात वैद्यकीय महाविद्यालयांची निर्मिती करणे असलेल्या सरकारी रुग्णालयांचा पूर्ण क्षमतेने वापर करणे त्याच सरकारी महाविद्यालयांना जोडून पूरक वैद्यकीय प्रशिक्षणाची व्यवस्था उभारणे खूप गरजेचे आहे. कोरोनाच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात मनुष्यबळ कमी पडले आणि प्रशिक्षण नसलेल्या लोकांनादेखील मदतीसाठी उपयोगात आणले गेले. परंतु ही परिस्थिती काही समाधानकारक ठरत नाही. बदललेल्या परिस्थितीनुसार यासर्व गोष्टींचा पुनर्विचार व्हायला हवा. सुखसुविधांची ज्याप्रमाणात निर्मिती होते. त्याप्रमाणात या सुविधांचा उपभोग घेणाऱ्यांची सुरक्षितता टिकवली गेली पाहिजे. म्हणूनच आवश्यक आणि अनिवार्य अशा वैद्यकीय क्षेत्राची झालेली अक्षम्य हेळसांड थांबवली पाहिजे. खाजगी क्षेत्रात मोठमोठी रुग्णालये पाहायला मिळतात. परंतु तिथे आकारले जाणारे शुल्क सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे असते. लाखो रुपये खर्च करूनही अनेकांचे प्राण वाचू शकले नाहीत. याचाच अर्थ सुरक्षिततेचे नवे निकष अधोरेखित झाले आहेत. योग्यवेळात उत्तम स्वरूपाची वैद्यकीय मदत पोहचवता येणे ही भविष्यातील अनिवार्यता असेल आणि परवडेल अशा दरात ही वैद्यकीय मदत देण्याची जबाबदारी सरकारची राहील.असे धोरण आखले गेले पाहिजे.

### महापालिकेचा निर्णय

अगदी आपल्या महाराष्ट्राचा जरी विचार केला तरी या गोष्टींची पूर्तता करता येऊ शकते. महाराष्ट्रात वैद्यकीय महाविद्यालयांचा तुटवडा आहे. दोन वर्षापूर्वी प्रत्येक जिल्हा रुग्णालयाला जोडून वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला गेला होता. राज्य सरकारची आणि महापालिकांच्या रुग्णालयांना जोडूनही वैद्यकीय महाविद्यालये वाढवता येऊ शकतात त्याला जोडूनच ज्याला आपण पॅरामेडिकल प्रशिक्षण म्हणू शकतो तेसुध्दा देता येऊ शकते. मुंबई महापालिकेने अलिकडेच तशा स्वरुपाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे आणि आता महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमधून अशा पॅरामेडिकल अभ्यासक्रमांची सुरुवात केली जाणार आहे. महापालिकेची रुग्णालये उत्तम दर्जाची आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांची गुणवत्तादेखील उत्तम स्वरूपाची आहे. एक तयार व्यवस्था उपलब्ध असल्याने त्याला जोडून पूरक वैद्यकीय अभ्यासक्रम सुरु करता येऊ शकतात. ज्याचा वैद्यकीय क्षेत्राला खूप मोठा लाभ होईल आणि त्यातूनच रोजगार निर्मिती किंवा कौशल्याचा विकास या गोष्टीदेखील सहजपणे घडून येऊ शकतील. वैद्यकीय क्षेत्राला आवश्यक असलेल्या अशा अनेक घटकांचा विचार होऊ शकतो. त्याची पूर्तता जर झाली तर भविष्यातीलकोणत्याही मोठ्या संकटाशी सामना करता येईल. प्रत्येक व्यक्तीचे प्राण वाचणे हीच खऱ्या अर्थाने सुरक्षिततेची फलश्रुती ठरते. दुर्दैवाने या गोष्टींकडे आतापर्यंत दुर्लक्ष झाले. आणि त्याचा तितकाच मोठा फटकाही सहन करावा लागला.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

इतरांचा नालायकपणा सिद्ध करण्यापेक्षा, स्वतःची लायकी सिद्ध करणं कधीही चांगलं.

## पंचांग

**सोमवार १८ ऑक्टोबर, २०२१**
**शक १९४३ प्लवनामसंवत्सर**

*** आश्विन शुक्ल त्रयोदशी * नक्षत्र - पूर्वा भाद्रपदा**

**रवी उदय- ०६-३५,**
**रवी अस्त- १८-१३**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०४-३२ कुंभ**
**०४-३३ ते २४-०० मीन**

श्री दादोजी कोंडदेव पुण्यतिथी

मुद्रक, प्रकाशक **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**

संपर्क : २३८८०९८१, जाहिरात :८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५, वितरणः २३८२४४६६,
ई-मेल navakal.1923@gmail.com
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Jayshree Ramakant Khadilkar Pande**

## कविता...

### शब्दाची किमया...!

शब्दचं घेती भरारी, शब्दांची दुनिया सारी,
शब्द छेडता सुर नवे, होते गगण सवारी!!

शब्द जपता मनोमनी, होते दूर चिंत्ता सारी,
शब्द शिकवी जगणे, शब्दांची ही सत्यवारी!!

शब्द जपावा नमोभाव, शब्दांत नसावा धर्म,
शब्दच संगती सोबती, शब्दचं दाखवे कर्म!!

शब्द जोडता शब्दाला, होते कथा , कविता ,
शब्द वाचता कळते, शब्द वाहते सरिता!!

शब्द विशाल डोंगर, शब्द असे मोह माया,
शब्दांच्या मैफिलीत, मिळते सुखाची छाया!!

शब्दाची किमया सारी, शब्दावाचून सर्व कळे ,
शब्द शब्द लिहित गेलो, शब्दामध्ये शृंगार जुळे!!

● **विशाल पाटील, वेरुळकर** ●
९३०७८२९५४२

# बीसीसीआयने प्रशिक्षकपदांसाठी मागवले अर्ज राहुल द्रविडची निवड आली अंतिम टप्प्यात



**माजी फलंदाज राहुल द्रविडची टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड ही अंतिम टप्प्यात आली असून मात्र आता केवळ औपचारिकता बाकी आहे. बीसीसीआयने टीम इंडियाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी अर्ज मागवले असून टीम इंडियाच्या मुख्य प्रशिक्षकपदासह फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षक प्रशिक्षकपद भरण्यात येणार आहेत. त्यासाठीही अर्ज मागवले आहेत.**

■ मुंबई

**मुख्य** प्रशिक्षकपदाचा हा करारा २०२३ पर्यंत असेल. याचा अर्थ हा करार २०२३च्या विश्वचषकापर्यंत असेल. म्हणजे राहूल द्रविड हा पुढील विश्वचषकापर्यंत मुख्य प्रशिक्षक असेल. या काळात वेतन म्हणून द्रविडला दरवर्षी १० कोटी रुपये वेतन मिळेल. द्रविड मुख्य प्रशिक्षक होणार असल्याने राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे अध्यक्षपद रिक्त होणार आहे. या अध्यक्षपदासाठीही अर्ज मागवण्यात आले असून मुख्य प्रशिक्षकपदासाठी २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत इच्छुकांना अर्ज पाठवायचे आहे, तर अन्य पदांसाठी ३ नोव्हेंबरची अंतिम तारीख ठेवण्यात आली आहे. आगामी टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेनंतर मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांचा कार्यकाळ संपणार आहे आणि ते करारात वाढ करण्यात इच्छुक नाहीत. त्यांच्या जागी राहुल द्रविडचे नाव निश्चित झालं आहे.

सुरुवातीला द्रविडने या जबाबदारीस नकार दिला होता, परंतु बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुलीने त्याला राजी केले. द्रविडने सहा वर्ष भारताच्या अ व १९ वर्षांखालील संघाचे प्रशिक्षकपद सांभाळले आहे आणि सध्या तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचा अध्यक्ष आहे. द्रविडने भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारण्यास होकार दिला आहे.

# ऋतूराज गायकवाडचे पिंपरीमध्ये जंगी स्वागत

■ पिंपरी



**फलंदाजी** करणारा चेन्नई सुपर किंग्जचा शिलेदार ऋतूराज गायकवाडचे आज रविवारी सकाळी जुनी सांगवीतील घरी आगमन होताच फटाक्यांच्या आतिषबाजीत जंगी स्वागत करण्यात आले. नागरिकांनी ऋतुराजाच्या घराबाहेर आकर्षक फुग्यांची सजावटही केली होती. ऋतुराज घराबाहेर येताच भारतीय संस्कृतीप्रमाणे कुटुंबीयांनी त्याचे औक्षणही केले.

आयपीएलमध्ये ऋतूराज गायकवाडच्या कामगिरीबद्दल कालच पुणेकरांनी फटाके फोडून व पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला होता. पिंपरी चिंचवड शहरामधून भारतीय संघात देशाचे प्रतिनिधित्व करणारा ऋतुराज पिंपरी-चिंचवडचा पहिला खेळाडू आहे. पुण्याच्या पुरंदर तालुक्यातील पारगाव नेमाने हे ऋतुराजचे मुळगाव वडील नुकतेच लष्कर सेवेतून वरिष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेले तर आई शिक्षिका आणि गृहिणी आहे. या हंगामात त्याने चेन्नई सुपर किंग्ज कडून खेळताना सर्वाधिक ६३५ धावा करून ऑरेंज कॅपचा मानकरी ठरला आहे. आयपीएलमध्ये चेन्नईकडून आपल्या भारदस्त रेखीव खेळाने क्रिकेट जगतातील तमाम क्रिकेट रसिकांचे लक्ष वेधणाऱ्या जुनी सांगवी च्या सुपुत्राने भारतीय संघातही स्थान मिळवलेले आहे.

# धोनीच्या उपस्थितीमुळे आत्मविश्वास वाढेल- विराट

**दुबई**- माजी कर्णधार एम. एस धोनीला टी२० विश्वचषकासाठी भारतीय संघाचा मार्गदर्शक म्हणून नेमण्यात आले आहे. यावरून भारतीय संघाचा कर्णधार विराट कोहली म्हणाला की, धोनीला खूप अनुभव आहे.

तो तेव्हापासून आमचा मार्गदर्शक राहिला आहे, जेव्हापासून आम्ही आमची कारकीर्द सुरू केली आहे. आणि संघात असेपर्यंत त्यानी ही भूमिका उत्तमरित्या निभावली आहे. विराट पुढे म्हणाला, त्या युवा खेळाडूंनाही खूप फायदा होईल, जे पहिल्यांदा इतकी मोठी स्पर्धा खेळणार आहेत. एखाद्या गुंतागुंतीच्या समस्येविरुद्ध त्याच्या दृष्टीकोनाने आणि सरावादरम्यान त्याने दिलेल्या सल्ल्याने आमचा खेळ किमान एक ते दोन टक्क्यांनी तरी सुधारेल. त्याच्या उपस्थितीमुळे आम्ही खूप आनंदी आहोत. त्याच्या उपस्थितीमुळे केवळ उत्साह वाढणार नाही, तर आत्मविश्वास आणखी वाढेल.

# भारतीय फुटबॉल संघाला 'सॅफ' स्पर्धेचे विजेतेपद

■ माले

**भारतीय** फुटबॉल संघाने आपली चमकदार कायम राखत तब्बल आठव्यांदा सॅफ अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकवले. शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने नेपाळवर ३-० अशी मात करत मुख्य प्रशिक्षक इगोर स्टिमॅच यांच्या मार्गदर्शनात पहिलेच जेतेपद पटकावले.



अंतिम सामन्यात भारताचे पारडे जड मानले जात होते आणि भारतीय संघाने सुरुवातीपासूनच वर्चस्व प्रस्थापित केले. चौथ्या मिनिटाला मोहम्मद यासिर आणि अनिरुद्ध थापा यांनी मारलेले सलग दोन फटके नेपाळचा गोलरक्षक किरण कुमार लिंबूने अडवले. यानंतर २७ व्या मिनिटाला कर्णधार सुनील छेत्रीचा गोल मारण्याचा प्रयत्न अपयशी ठरला. तसेच नेपाळचा गोलरक्षक किरणनेही आणखी काही फटके अडवल्याने मध्यंतराला गोलशून्य बरोबरी होती. उत्तरार्धात मात्र भारताच्या आक्रमणाला अधिक धार आली. ४९व्या मिनिटाला छेत्रीने गोल करत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली, तर पुढच्याच मिनिटाला सुरेश सिंहच्या गोलमुळे भारताची आघाडी दुप्पट झाली. त्यानंतर पिछाडीवर पडलेल्या नेपाळने आक्रमक खेळ करण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारताने प्रतिहल्ला सुरु ठेवत नेपाळच्या बचावफळीवर दडपण टाकले. अखेर ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत सहाल अब्दुल समदने गोल करत भारताला हा सामना ३-० असा जिंकवून दिला.

# हॉकी जूनियर चैम्पियनशिप स्पर्धा आजपासून सुरु

**नवी दिल्ली-** हॉकी इंडियातर्फे आयोजित करण्यात आलेली जूनियर पुरुष अकादमी राष्ट्रीय चैम्पियनशिप स्पर्धा उद्या सोमवारपासून सुरू होणार असून भोपाळमध्ये पार पडणाऱ्या या स्पर्धेत एकूण २८ संघ सहभागी होणार आहेत. त्यात ५०० पेक्षा अधिक खेळाडू आपले नशीब आजवमणार आहेत. या स्पर्धेचा अंतिम सामना २७ ऑक्टोबर रोजी खेळवला जाईल.

२४ ऑक्टोबर रोजी क्वार्टरफाइनल आणि २६ ऑक्टोबरला सेमीफाइनलचा थरार पाहायला मिळेल. घुमनहेरा राइज़र अकादमीचे कोच बलजीत सिंह म्हणाले की, राज्याच्या संघात ज्या खेळाडूंना खेळण्याची संधी मिळत नाही अशा खेळाडूंना आपल्याला सिद्ध करण्याची या स्पर्धेत एक संधी मिळते.

# ओमानचा १० गडी राखत पपुआ न्यू गिनीवर विजय

■ मस्कट

**टी-२०** क्रिकेट वर्ल्डकप स्पर्धेतील क्वालिफायर राउंडच्या पहिल्या सामन्यात रविवारी ओमानने १० गडी राखून पपुआ न्यू गिनीवर विजय मिळवला आणि पपुआ न्यू गिनीने अडखळत सुरुवातीनंतरही ९ बाद १२९ धावांपर्यंत मजल मारली होती. मात्र ही धावसंख्या ओमानचे सलामीवीर फलंदाज जतींदर सिंग (७२ नाबाद )आणि अकब इल्यास (५०नाबाद) यांनी १३१ धावांची दमदार भागीदारी करत १३.४ षटकांमध्ये सहज पार केली. जतींदरने फक्त ४२ चेंडूत ४ षटकार ठोकत ७२ धावांची सुरेख खेळी केली. त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. ओमानने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पापुआ न्यू गिनी संघाची सुरुवात खराब झाली. पहिल्या आणि दुसऱ्या षटकात त्यांनी लागपोठ दोन विकेट्स गमावल्या.सलामीवीर टोनी उरा ५ चेंडू खेळून खातेही न उघडता परतला. बिलाल खानने त्याला बाद केले. त्यानंतर दुसऱ्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर खलीमुल्लाहने लेगा सैकाला खातेही न उघडू देता माघारी धाडले. एकही धाव नसताना दोन विकेट गमावल्यामुळे पापुआ न्यू गिनी संघ बॅकफूटवर होता. कर्णधार असद वलाने दबावात अर्धशतकी खेळी करत संघाचा डाव सावरला. त्याने चार्ल्स अमीनीच्या साथीने तिसऱ्या विकेटसाठी ८१ धावांची भागीदारी केली. वलाने षटकार खेचून दिमाखात अर्धशतक झळकावले. त्यानंतर तो माघारी फिरला. त्याने ४३ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकाराच्या मदतीने ५६ धावांची खेळी केली. २० षटक पूर्ण झाल्यानंतर पापुआ न्यू गिनी संघाने १२९ धावसंख्या (९ बाद) उभारली होती.

# पाकिस्तानला भारताच्या एकाही क्रिकेटपटूकडुन धोका नाही! पाकिस्तानच्या कर्णधाराचा विश्वास

■ कराची

**टी-** २० विश्वचषकात न्यूझीलंडचा कर्णधार केन विलियम्सन हा सर्वात घातक फलंदाज सिद्ध होईल. तर गोलंदाजांमध्ये पाकिस्तान संघाचा वेगवान गोलंदाज हसन अली विरोधक फळांदाजांची भंबेरी उडवेल. भारताचा एकही क्रिकेटपटू पाकिस्तान संघासाठी धोक्याची घंटा असेल, असा विश्वास पाकिस्तान संघाचा कर्णधार बाबर आझमने व्यक्त केला. आझम म्हणाला की, आमचे मनोबल उंचावलेले आहे आणि आम्ही भारताविरुद्धचा पहिला सामना जिंकत स्पर्धेची सकारात्मक सुरुवात करू इच्छित आहोत. कोणत्याही स्पर्धेत सुरुवातीला लयीत येण्यासाठी संघाचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे असते. मी टी२० विश्वचषकादरम्यान रिझवानसोबत डावाची सुरुवात करण्यासाठी जाईल. परिस्थितीनुसार आमच्या या योजनेत बदलही होऊ शकतो. यासाठी मोहम्मद हाफिज आणि शोएब मलिक या अनुभवी खेळाडूंची आम्हाला मदत होईल, आम्हाला माहिती आहे की, युएईतील खेळपट्टी कशा असतील आणि फलंदाजांना तेथे कसे सामंजस्य बसवावे लागले. सामन्यादिवशी जो संघ चांगला खेळेल तोच संघ जिंकेल. मला तर वाटते की, आम्हीच हा सामना जिंकू. आम्हाला दबावाची जाणीव आहे. त्यामुळे अपेक्षा आहे की, आम्ही हा सामना जिंकत लयीत येऊ. भूतकाळात झालेल्या गोष्टींचा आम्ही जास्त विचार करत नाही. आम्ही फक्त भविष्याविषयी विचार करतो आणि सद्या त्याचीच तयारी करतो आहोत.

# देश अंधारात आहे, त्यामुळे यूपीला योगी नाही तर योग्य सरकारची गरज आहे

## अखिलेश यादवांचा भाजपवर घणाघात

■ लखनौ

**खोटी** आश्वासने आणि प्रचाराद्वारे उत्तर प्रदेशात सरकार चालवणाऱ्या भारतीय जनता पक्षाला चिरडण्यासाठी जनता तयार आहे. त्यामुळे उत्तर प्रदेशला आता योगी सरकारची नव्हे तर सक्षम आणि योग्य सरकारची गरज असल्याचा घणाघात समाजवादी पक्षाचे (सपा) अध्यक्ष अखिलेश यादव यांनी भाजपवर घातला. रविवारी सपा मुख्यालयात यादव यांनी बहुजन समाज पक्षाचे (बसपा) माजी प्रदेशाध्यक्ष आर एस कुशवाह यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कर्मचारी संयुक्त परिषदेचे नेते हरिकिशोर तिवारी, मुझफ्फरनगरचे माजी खासदार कादिर राणा आणि त्यांच्या समर्थकांना समाजवादी पक्षाचे सदस्यत्व देण्यात आले. योगी सरकारने जनतेला एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचे आश्वासन दिले पण त्याचा काही परिणाम झाला नाही. अखिलेश यादव यांनी रविवारी भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले, यूपीतील जनतेने विश्वास ठेवून योगी सरकारला लोकसभेत आणि २०१७ मध्ये उत्तर प्रदेशात दोनदा सरकार स्थापन करण्यास मदत केली, परंतु त्यांच्या अपेक्षा पायदळी तुडवल्या गेल्या. ते म्हणाले की, केंद्रातील मोदी सरकारने देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्स बनवण्याचे आश्वासन दिले होते, तर उत्तर प्रदेशातील योगी सरकारने लोकांना एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याचे आश्वासन दिले होते, पण त्याचा परिणाम अजूनही तसाच आहे. ते म्हणाले की महागाई नियंत्रित करण्याचे आश्वासन देखील कोरे कागद असल्याचे सिद्ध झाले. सकाळच्या चहापासून रात्रीच्या जेवणापर्यंत ते कित्येक पटीने महाग झाले आहे. सर्व गरीब मजूर आज उपासमारीच्या मार्गावर आहेत. पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल, डाळींचे भाव गगनाला भिडत आहेत. आपला देश जागतिक निर्देशांकात पाकिस्तान, नेपाळ आणि बांगलादेशच्याही मागे गेला आहे. कुपोषणात उत्तर प्रदेश देशात पहिल्या क्रमांकावर आहे. हे सर्व भाजप सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे घडले आहे. ते म्हणाले की, भाजपा सरकार मोठ्या प्रमाणावर गरीब लोकांना गहू आणि तांदूळ देत असल्याचे सांगते, पण ते लोकांचे पोट भरण्यास सक्षम नाही. सपा सरकारच्या कार्यकाळात सुरू झालेली अक्षय पत्र योजना केवळ लखनौमध्ये मर्यादित राहिली आहे. मुलांचे शिक्षण डबघाईला आले आहे. शिक्षणाची सोय नाही. तरुणांना रोजगार नाही. देशाचे भविष्य अंधारात आहे. हे सरकार फक्त घोषणा आणि जाहिरातींमध्ये चांगले दिसते. सरकार म्हणते की त्याने एक लाख नोकऱ्या दिल्या आहेत. तसे असल्यास, सरकारने नोकरी शोधणाऱ्यांची यादी सार्वजनिक करावी. तसेच लखीमपूर प्रकरणाचा निषेध करत ते म्हणाले, जर शेतकऱ्याने आपल्या हक्कांची मागणी केली तर त्याला टायरने चिरडले जाते. सर्वसामान्यांचे खरे तर तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा पोषक आहे पण त्याला दहशतवादी ठरवले जाते.

**‘झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस’ आणि ‘सोनी पिक्चर्स नेटवर्क इंडिया’ या मनोरंजन विश्वातील दोन मोठ्या वाहिन्यांचे समूह एकत्र येणार असल्याची घोषणा अलीकडेच करण्यात आली होती. परंतु विलीनीकरणाच्या या घोषणेनंतर ‘झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस’ आणि त्याचा सर्वात मोठा भागधारक असणाऱ्या ‘इन्व्हेस्को’ ग्रुपमध्ये नव्या वादाला तोंड फुटले आहे. या विलीनीकरणाने भागधारक आणि भागधारकांच्या हितास हानी पोहचणार नाही, असे ‘झी’च्या संचालक मंडळाने म्हटले असले तरी हा करार भागधारकांच्या हिताचा नसल्याचे ‘इन्व्हेस्को’चे म्हणणे आहे. ‘झी’ विरुद्ध ‘इन्व्हेस्को’ हा वाद सध्या राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे पोहोचला आहे. ‘झी’ समूह आणि ‘इन्व्हेस्को’ हे दोघेही आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी एकमेकांवर झाडत असताना आता ‘इन्व्हेस्को’ने नवे शस्त्र उपसले आहे. ‘झी एंटरटेनमेंट एंटरप्राइजेस’च्या अडीच लाख भागधारकांना खुले पत्र लिहीत ‘इन्व्हेस्को’ने या विलीनीकरणाच्या प्रस्तावावर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. तर दुसरीकडे ‘इन्व्हेस्को’कडून आपल्यावर एका मोठ्या भारतीय उद्योग समूहाशी करार करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला गेला असल्याचा आणि करार न झाल्याने गोएंका कुटुंबाला लक्ष्य करण्यात येत असल्याचा आरोप झी ने केला आहे.**

# झी- सोनीचे विलीनीकरण
# नव्या वादाला आमंत्रण




**‘झी’** आणि ‘इन्व्हेस्को’ यांच्यात जवळपास एक महिन्यापासून कंपनीच्या नियंत्रणावरून वाद सुरू आहे. ‘इन्व्हेस्को’चा ‘झी’मध्ये १८ % हिस्सा आहे तर ‘झी’चे संस्थापक असलेल्या सुभाष चंद्रा गोएंका यांच्या कुटुंबाकडे फक्त ४ % हिस्सा आहे. असे असूनही कंपनीचा कारभार गोएंका कुटुंबाकडे राहण्याची पूर्ण व्यवस्था त्यांनी केली आहे. त्यामुळेच ‘झी’मधील सर्व महत्त्वाच्या पदांवर त्यांच्याच कुटुंबातील माणसे आहेत असे म्हणत ‘इन्व्हेस्को’ने गोएंका समूहाची एकहाती सत्ता कमी करण्याची जोरदार तयारी सुरू केली होती. ‘झी’चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक पुनीत गोएंका आणि अन्य दोन संचालकांना हटवून, सहा नव्या संचालकांच्या नियुक्तीसह संचालक मंडळाची पुनर्रचना केली जावी, या मागणीवर ‘इन्व्हेस्को’ आग्रही होती. त्यांनी भागधारकांना लिहिलेल्या पत्रात देखील या मागणीचा पुनरुच्चार केला आहे. पुनीत गोएंका, अशोक कुरियन आणि मनीष चोखानी यांना संचालक मंडळावरून बरखास्त करावे, यासाठी कंपनीच्या समभागधारकांची विशेष साधारण सभा बोलवावी, अशी नोटीस ‘इन्व्हेस्को’ने कंपनीच्या संचालक मंडळाला ११ सप्टेंबरला पाठवली होती. या सभेमध्ये सुभाष चंद्रा यांचा मोठा मुलगा असलेल्या पुनीत गोएंका यांना मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरून हटवण्याच्या मागणीचा प्रस्ताव ठेवण्यात येणार होता. सभेत ५० टक्क्यांवर भागधारकांची अनुमती मिळाल्यास गोएंकांना संचालक पद सोडावे लागणार होते. परंतु त्याआधीच ‘झी’ने सोनीबरोबर विलीनीकरण कराराची घोषणा केल्याने सर्व भागधारकांना आश्चर्याचा धक्का बसल्याचे ‘इन्व्हेस्को’चे म्हणणे आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या करारासोबतच पुनीत गोएंका मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून पुढील पाच वर्षांसाठी काम पाहणार असल्याचेही जाहीर करण्यात आले.

दुसरीकडे, ‘झी’ने ‘इन्व्हेस्को’वर नाराजी व्यक्त करत आपली बाजू मांडली आहे. ‘इन्व्हेस्को’च्या दोन प्रतिनिधींनी पुनीत गोएंका यांच्याकडे भारतातील एका मोठ्या उद्योग समूहाशी ‘झी’ने करार करावा असा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावामध्ये करार झाल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक म्हणून पुनीत गोएंका यांची नियुक्ती केली जाईल असे वचनही देण्यात आले होते. परंतु काही कारणांनी पुनीत गोएंका यांनी ही ऑफर नाकारली आणि त्यानंतर सोनीसोबत करार केला. आपली ऑफर नाकारल्याने नाराज झालेल्या ‘इन्व्हेस्को’ ग्रुपने मग ‘झी’ समूहाला आणि गोएंका कुटुंबीयांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आणि या विलीनीकरणाबद्दल भागधारकांच्या मनात भीती निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केल्याचे , ‘झी’ने म्हटले आहे.

दरम्यान, ‘झी’ एन्टरटेन्मेंटचे संस्थापक आणि अध्यक्ष सुभाष चंद्रा यांनी एका मुलाखतीत ‘इन्व्हेस्को’ ग्रुप कंपनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आणि कोणाच्या तरी सांगण्यावरून हे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप केला आहे. ‘ ‘इन्व्हेस्को’ आमच्या सर्वात जुन्या भागधारकांपैकी एक आहे आणि ते असे पाऊल का उचलत आहेत हे मला समजत नाही. ‘झी’चे खरे मालक त्यांचे अडीच लाख भागधारक आहेत. त्यांना निर्णय घेऊ द्या. ‘इन्व्हेस्को’ हा एक खाजगी इक्विटी फंड आहे. कोणताही खाजगी इक्विटी फंड ‘झी’ टीव्हीसारखे मोठे नेटवर्क चालवू शकणार नाही. त्यामुळे नक्कीच ‘इन्व्हेस्को’च्या खांद्यावर बंदूक ठेवून, कंपनी कायद्याच्या नियमाच्या आडून कोणीतरी ‘झी’ काबीज करण्याचा डाव रचत आहे. परंतु कोणतेही संकट आले तरी आम्ही लढायला सज्ज आहोत.’ असे सुभाष चंद्रा म्हणाले आहेत.

## परभणी, वाशिमला परतीच्या पावसाचा फटका

**परभणी** - परभणीसह वाशिम जिल्ह्यात काल रात्रीपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला. मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे शेतातील उभे पिक वाहून गेले आहे. सोयाबिन पिकालाही पावसाचा फटका बसला असून यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. परभणी शहरासह जिल्ह्याभरात काल रात्रीपासून संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे सोयाबीन काढणी थांबली असून ज्या शेतकर्यांनी आपले सोयाबीन काढले आहेत त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अगोदरच यंदा परभणी जिल्ह्यात सरासरीच्या जास्त पाऊस झाला आहे ज्यात साडे चार लाख हेक्टरवरील नुकसान झालेले आहे. त्यातून जे काही वाचले आहे ते पदरात पाडून घेण्याचा शेतकरी प्रयत्न करत आहेत मात्र पुन्हा पाऊस सुरु झाल्याने तेही हाथी लागण्याची शक्यता आता मावळली आहे. वाशिममध्येही काल रात्री पावसाने जोरदार हजेरी लावली. पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले होते. उभ्या शेतात पाणी शिरल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

## उत्तराखंडला पावसाचा इशारा! रेड अलर्ट

### शाळा बंदचे आदेश

**उत्तराखंड-** भारतीय हवामान विभागाने उत्तराखंडमध्ये १८ऑक्टोबरला अतिवृष्टीसाठी रेड अलर्ट आणि १९ ऑक्टोबरला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. उत्तराखंडच्या बहुतांश ठिकाणी पहाटेच्या वेळी पाऊस सुरू झाला आणि उंच डोंगरांवर बर्फवृष्टीमुळे हवामान खात्याने पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी अधिकाऱ्यांना सतर्क राहण्यास सांगितले आणि पर्यटक आणि चारधाम यात्रेला प्रतिबंध करत येणाऱ्या भाविकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले. धामी यांनी राज्यातील मुसळधार पावसाबाबत मुख्य सचिव डॉ एस एस संधू यांच्याकडून परिस्थितीची माहिती घेतली आणि पोलीस, एसडीआरएफ आणि इतर संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना संवेदनशील ठिकाणी हाय अलर्टचे निर्देश दिले.तर चार धाम यात्रा मार्गावर विशेष काळजी घेण्याच्या सूचना देताना ते म्हणाले की, भाविक आणि पर्यटकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन केले पाहिजे. गढवाल आणि कुमाऊंमधून मिळालेल्या माहितीनुसार, सकाळपासून राज्याच्या बहुतांश भागात पाऊस पडत आहे.

## खारच्या झोपडपट्टीत डेंग्यू, मलेरियाचा शिरकाव

### अनेक नागरिक तापाने फणफणले

■ मुंबई

**खार** (पूर्व) च्या झोपडपट्यांमध्ये डेंग्यू व मलेरियाने शिरकाव केला आहे. अनेक रहिवाशी तापाने फणफणले आहेत. आधीच कोरोनामुळे धास्तावलेल्या स्थानिकांना आता डेंग्यू व मलेरियाची चिंता सतावू लागली आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. बदलते वातावरण आणि वस्त्यातून वाढत्या डासांचा सुळसुळाट यामुळे खार जवाहर नगर, आदर्श लेन, टिळक नगर, जयहिंद नगर, तीन बंगला, चमडावाडी, अमृत नगर आदी वस्त्यातून तापाची साथ पसरली आहे, अशी माहिती देऊन येथील रहिवाशी पुढे म्हणाले की, घराघरांमध्ये तापाचे रुग्ण झपाट्याने वाढत असून वैद्यकीय उपचारासाठी खासगी दवाखान्यात रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. या वस्त्यातून डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी किटक नियंत्रक विभागाचे प्रयत्न तोकडे पडत आहेत. तर पालिकेच्या आरोग्य विभागाने तापावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही रहिवाशांच्या आरोग्यावर भर देण्यास प्रशासनाला भाग पाडले पाहिजे. अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे.


### सूचना

**सौ. रुपल धुपेलिया (‘दिवंगत सदस्य’)** या **सॅटेलाईट सिल्व्हर को-ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसायटी लि.**, पत्ता - सीटीएस क्र. १६१३, १६१३/१, एम. व्ही. रोड, मरोळ, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०५९ (‘संस्था’) च्या सदस्या आणि डिस्टिंक्टीव्ह क्र. ९६ ते १०० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या भाग प्रमाणपत्र क्र. १९ अंतर्गत रु. ५०/- प्रत्येकी किंमतीच्या ५ (पाच) भागांमधील ५०% हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंधाच्या धारणकर्त्या आणि **‘सॅटेलाईट सिल्व्हर’** या संस्थेच्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील युनिट क्र. २०४ मधील ५०% हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंधाच्या धारणकर्त्या **दि. २४ फेब्रुवारी, २०२१** रोजी कोणतेही नामनिर्देशन न करता मरण पावल्या.

दिवंगत सदस्याचे पती श्री. मनोज धुपेलिया यांनी संस्थेकडे दिवंगत सदस्याचे सदर समभाग, सदर युनिटमधील ५०% हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध आणि दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल / मालमत्तेमधील हितसंबंध त्याच्या नावे हस्तांतरित करण्याकरिता अर्ज केला आहे.

संस्था याद्वारे दिवंगत सदस्याचे सदर समभाग, सदर युनिटमधील ५०% हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध आणि दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील हितसंबंध **श्री. मनोज धुपेलिया** यांच्या नावे हस्तांतरित करण्यास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये, संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग, सदर युनिट आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्यांच्या/ आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह, दावे किंवा आक्षेप मागवित आहे. वर विहीत केलेल्या कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/ आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याच्या संस्थेच्या भांडवल / मालमत्तेमधील भाग आणि हितसंबंधांबाबत संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल.

सही/-
सॅटेलाईट सिल्व्हर को-ऑप. प्रिमायसेस सोसायटी लि.
करिता आणि त्यांच्या वतीने
मान. सचिव

**ठिकाण:** मुंबई
**दिनांक:** १८.१०.२०२१

रामेश्वर मिडीया


### शुभ राशी
**सोम. दि.१८/१०/२०२१**

| | | |
|---|---|---|
| ० | ५ | ३ |
| ०२ | ५२ | ३२ |
| ०७ | ५७ | ३७ |
| २८० | १४० | १२० |
| ३७० | १५९ | १३९ |

## दारूसाठी पैसे न दिल्याने मुलाकडून आईची निर्घृण हत्या

■ पुणे, प्रतिनिधी

**दारुसाठी** वारंवार पैसे मागूनही ते न दिल्याने एका ३२ वर्षीय तरुणाने साठ वर्षीय आईचा खून केला. लोखंडी सळई व हातातील कड्याने मारहाणकरून खून केल्याने एकच खळबळ उडाली आहे. पुण्यातील सिंहगड रोड भागात ही घटना घडली आहे. पोलिसांनी मुलाला अटक केली आहे. विमल दत्तोपंथ कुलथे (६०, रा. नर्हे) असे खून झालेल्या आईचे नाव आहे. याप्रकरणी मुलगा सचिन कुलथे (३२) याला अटक केली आहे.

याप्रकरणी अनिता चिंतामणी यांनी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. या प्रकरणी अधिक माहिती, आरोपी सचिन कुलथे यांना दारूचे व्यसन होते. तो काहीही कामधंदा करीत नव्हता. घटनेच्या दिवशी त्याने आईकडे दारू साठी पैसे मागितले होते. परंतु पैसे न दिल्याने त्याने रागाच्या भरात आईला बेदम मारहाण केली. डोक्यात लोखंडी सळई व हातातील कड्याने मारहाण केली. त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## अफगाणिस्तानचे माजी पंतप्रधान अहमद शाह अहमदझाईंचे निधन

**काबूल-** अफगाणिस्तानचे माजी पंतप्रधान अहमद शाह अहमदझाई यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. अहमद शाह अहमदझाई यांनी १९९२ ते १९९४ पर्यंत अफगाणिस्तान सरकारमध्ये विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले. यानंतर ते १९९५ ते १९९६ पर्यंत अफगाणिस्तानचे पंतप्रधान होते. यानंतर तालिबान्यांनी देशावर कब्जा केला आणि माजी पंतप्रधानांना देश सोडावा लागला. भारतात राहणारे अहमद शाह अहमदझाई याच महिन्यात भारतातून अफगाणिस्तानात परतले होते. अहमद शाह अहमदझाई यांचा जन्म काबुल प्रांतातील खाकी जब्बार जिल्ह्यातील मलंग या गावी झाला. त्यांनी काबूल विद्यापीठात अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आणि नंतर कृषी मंत्रालयात काम केले. १९७२ मध्ये त्यांना अमेरिकेतील कोलोराडो स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये शिकण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. त्यांनी १९७५ मध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आणि सौदी अरेबियातील किंग फैसल विद्यापीठात प्राध्यापक झाले. १९७८ मध्ये कम्युनिस्ट बंडानंतर अहमदझाई मुजाहिदीनमध्ये सामील होण्यासाठी अफगाणिस्तानात परतले. ते बुरहानुद्दीन रब्बानीचे जवळचे सहकारी होते.


### जाहिर नोटीस

माझ्या अशिल सौ. सुप्रिया संतोष शिंदे (माहेरचे नांव शोभना अशोक भोसले). वय ४७ वर्षे, राहणार - न्यु बी.डी.डी. चाळ क्र. २/बी, रुम क्र. ५६, वि.वाय. दहिवलकर बुवा मार्ग, नायगांव, मुंबई- ४०० ०१४, यांच्या सांगण्यावरुन जाहिर नोटीस देत आहे.

माझ्या अशिलांचे वडील अशोक बाजीराव भोसले हे बृहन्मुंबई पोलीस दलात सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बक्कल क्र. १०५५९, नायगांव पोलीस मुख्यालय येथे कार्यरत होते. ते नियत वयोमानानुसार दिनांक ३०/११/२००८ रोजी सेवानिवृत्त झाले व त्यांचे दिनांक २७/१०/२०१९ रोजी निधन झाले असून, माझी आई श्रीमती रत्नप्रभा अशोक भोसले यांचे दिनांक ०४/११/२०२० रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात खालील प्रमाणे वारस आहोत.

| अ.क्र. | नाव | मयत व्यक्तीशी नाते |
|---|---|---|
| १. | श्री. योगेश अशोक भोसले | मुलगा |
| २. | सौ. सुप्रिया संतोष शिंदे (माहेरचे नाव शोभना अशोक भोसले) | विवाहित मुलगी |

या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत.

माझ्या अशिलांचे म्हणणे आहे की, माझ्या अशिलांना बी.डी.डी. चाळ पुर्नविकास प्रकल्प अंतर्गत शासन निर्णयाचा फायदा मिळण्याकरीता पात्र ठरविणे आवश्यक असल्याने मयत अशोक बाजीराव भोसले यांच्या पश्चात माझ्या अशिल हया कायदेशीर वारस विवाहित मुलगी असून माझ्या अशिल वारस प्रमाणपत्रासाठी जाहिर नोटीस देत आहेत. यासाठी कोणताही ना हरकत आक्षेप असल्यास १५ दिवसांत आपली तक्रार नोंद करावी अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहित धरण्यात येईल.

सही/-
**एस.बी.शिंदे**
वकिल, हायकोर्ट
परेल, भोईवाडा, मुंबई-१२



बृहन्मुंबई महानगरपालिका

**आरोग्य पायाभूत सुविधा सेल**

क्र. मु.अ./इ.दे./११७८३/एचआयसी दि. १४.१०.२०२१

**लघु ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | मुख्य अभियंता (इ. दे.) |
| उप विभाग | उप मुख्य अभियंता (आरोग्य पायाभूत सुविधा सेल) |
| निविदा क्र. | **बोली क्र. ७१०००१४३२०** |
| विषय | “एफ/दक्षिण वॉर्ड येथे केईएम रुग्णालय, परेलच्या परिसरामध्ये मुली/मुलांच्या वसतीगृह इमारत आणि सर्व्हन्ट चाळीची महत्त्वाची संरचनात्मक दुरुस्ती.” |
| निविदा विक्री | दि. १८.१०.२०२१ रोजी स. ११.०० पासून दि. २७.१०.२०२१ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत |
| वेबसाईट | http://portal.mcgm.gov.in |
| संबंधित व्यक्ती | स.अभि.(एचआयसी) शहर/अ.अभि.(एचआयसी) शहर |
| नाव | श्री. राहुल इशि/ श्री. प्रशांत सुदेवाड |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२-२४९०१९३६ |
| ईमेल आयडी | dyche01hic.pd@mcgm.gov.in |

सही/-
आर. टी. सोनावणे
पीआरओ/१३०६/जाही./२०२१-२२ **उप मु.अभि.(एचआयसी)**

**कोणताही ताप असू शकतो हिवताप/मलेरिया.**



### जाहीर नोटीस

महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सु.नि. व पू.) न्यायाधिकरण, रुम क्र. २६ व २९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

खालील परिशिष्टात दर्शविलेल्या धारकांनी या न्यायाधिकरणापुढे उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी यांनी जाहीर केलेल्या गलिच्छ वस्ती घोषणेविरुद्ध अपिल दाखल केले आहे. सदर मिळकतीतील रहिवाशांना महाराष्ट्र गलिच्छ वस्ती अधिनियम १९७१ मधील कलम ४ (५) अन्वये या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की सदर रहिवाशांनी तसेच हितसंबंधितांनी या न्यायाधिकरणापुढे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्याचे म्हणणे लेखी स्वरुपात दाखल करावे तसे न केल्यास सदर रहिवाशांना काहीही मांडावयाचे नाही असे समजून अपिलाचे सुनावणी केली जाईल याची नोंद घ्यावा.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | अपिलकर्त्याचे नाव | अपिल क्र. | मिळकतीचे वर्णन | जाहीर झालेली अधिसूचना क्र. | राजपत्राचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. रविंद्र लक्ष्मीदास पंजवानी ६१०, हेरिटेज पॅरोडी,१,तुलास्कर वाडी, साई नगर, एम.जी. क्रॉस रोड नं. १, मुंबई - ४०० ०६७. व २ इतर विरूध्द उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी तालुका बोरीवली एस.आर.ए बिल्डिंग, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१ | ३५/२०२१ | सर्व्हे क्र. ३४, हिस्सा क्र. ६, ओल्ड फाळणी क्र. ४, सी.टी. एस.क्र.२०८ (भाग), २१७ (भाग) आणि २१८ गांव मागाठाणे, तालुका बोरीवली, मुंबई. | क्र. एसएए-बोरीवली/ XIV | २४ नोव्हेंबर, १९८३ |

दिनांकः १३.१०.२०२१
मुंबईः ४०००५१

न्यायाधिकरणाचा शिक्का

सही/-
अध्यक्ष
महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सु.नि. व पु.) न्यायाधिकरण



## आर्टसन इंजिनियरिंग लिमिटेड

सीआयएनः L27290MH1978PLC020644

(टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडची सहाय्यक कंपनी)

नोंद. कार्यालयः २ रा मजला, एक बोलेवर्ड, लेक बोलेवर्ड रोड, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई, मुंबई - ७६, महाराष्ट्र.
दूर. क्र.: ०२२-६६२५५६००; ईमेलः investors@artson.net; वेबसाईटः www.artson.net

**३० सप्टेंबर, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि सहामाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाच्या(यूएफआर) विवरणपत्राचा सारांश**

(वेगळा उल्लेख केलेला नसल्यास रु. लाखात)

| अ. क्र. | तपशील | ३०.०९.२०२१ रोजी संपलेली सहामाही | ३०.०९.२०२० रोजी संपलेली सहामाही | ३१.०३.२०२१ रोजी संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यातून एकूण उत्पन्न | ८४८०.२८ | ५९५४.७३ | १५२३२.१७ |
| २ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) | १४८.५४ | (५१२.७४) | (५११.१८) |
| ३ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) | ८८.८७ | (५४५.२१) | (५६७.८८) |
| ४ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | ९२.४१ | (५४२.२१) | (५६०.८१) |
| ५ | सम भाग भांडवल | ३६९.२० | ३६९.२० | ३६९.२० |
| ६ | गत वर्षीच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार राखीव | (३५७.७३) | १४६.७१ | (३५७.७३) |
| ७ | प्रतिभाग उत्पन्न (रु. १/- प्रत्येकीचे) | | | |
| | १. मूळ | ०.२४ | (१.४८) | (१.५४) |
| | २. सौम्यीकृत | ०.२४ | (१.४८) | (१.५४) |

**टिपा:**

१. दि. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी कंपनीचा संचित तोटा (इतर सर्वसमावेशक उत्पनांसह) रु. ४,६२२.१९ लाख एवढा आहे. गत वर्षादरम्यान झालेल्या लक्षणीय कार्यरत तोट्यामुळे आणि इतर संकेतांमुळे, कंपनीच्या संचालक मंडळासह व्यवस्थापनाने गोईंग कन्सर्न म्हणून सुरु राहण्याबाबत त्यांच्या क्षमतेचे मूल्यांकन केले. संचालक मंडळाने मंजूर व्यवसाय योजनेच्या त्यांच्या आढाव्यावर आणि वित्तीय निष्कर्षाच्या दिनांकापासून पुढील बारा महिन्यांकरिता बनविलेल्या भविष्यातील रोखीच्या प्रवाहाच्या अंदाजावर आधारित असे मूल्यांकन केले आहे की, खालील कारणे विचारात घेता वित्तीय निष्कर्षाच्या दिनांकापासून पुढील बारा महिन्यांकरिता त्यांचे रोख प्रवाह आवश्यकता प्राप्त करणे कंपनीस शक्य आहेः

अ) खालील बाबींवर लक्ष केंद्रीत करून कंपनीस भविष्यात व्यवसायात वाढ, ऑपरेटींग मार्जिनमध्ये सुधारणा आणि रोख प्रवाहामध्ये सुधारणा अपेक्षित आहेः

i. कंपनीकडे दि. ३० सप्टेंबर, २०२० रोजी जवळपास रु. २०,७४४.०१ लाखांची आरक्षित ऑर्डर प्रलंबित आहे. त्याव्यतिरिक्त, कंपनीने यापूर्वी बोली लावलेल्या काही ऑर्डर्स प्राप्त होण्याबाबत कंपनी आशावादी आहे.

ii. कंपनी मे. टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेड (‘टीपीएल“) होल्डींग कंपनीकरिता अनेक प्रकल्पांच्या बोली प्रक्रियेमध्ये आहे आणि त्यांना स्पर्धात्मक बोली आणि आर्म्स लेन्थ प्रायसिंग नॉर्म्सवर आधारित टीपीएल कडून येत्या त्रैमासिकामध्ये ऑर्डर्स मिळण्याची अपेक्षा आहे.

iii. कंपनीने पुढील तिमाहीमध्ये ग्राहकांच्या दाव्यांकरिता यशस्वी पाठपुरावा करण्याची कंपनीची योजना आहे, ज्यामुळे त्यांचे ऑपरेटींग मार्जिन्स तसेच त्यांचा रोख प्रवाह लक्षणीयरित्या वाढू शकेल.

iv. कंपनीचे काही महत्त्वाचे प्रकल्प पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यामध्ये आहेत आणि या प्रकल्पांची प्रलंबित कामे पुढील त्रैमासिकामध्ये पूर्ण करण्याची कंपनीची योजना आहे. यामुळे देयके न केलेली महसूल रक्कम कमी होईल आणि त्यामुळे कंपनीचे कार्यरत भांडवल/रोख प्रवाह स्थितीमध्ये सुधारणा होईल.

v. कंपनी त्यांची कर्ज घेण्याची सुविधेचे पुनरावलोकन करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहे आणि सध्या धनकोंसह कमी व्याजदराकरिता बोलणी करीत आहे. याद्वारे त्यांचे वित्तीय खर्च कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे ज्यामुळे एकूण मार्जिनमध्ये सुधारणा होईल.

vi. ३० जून, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिकादरम्यान, कंपनीने त्यांचे रु. १,००० लाख एवढ्या किंमतीचा धारणा कंपनीस देय व्यवसाय १० वर्षांच्या कालावधीकरिता व्याज मुक्त कर्जामध्ये परावर्तित केला. यामुळे कंपनीच्या एकूण खेळत्या भांडवल स्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. त्याव्यतिरिक्त, भारतीय लेखा मानक १०९च्या आवश्यकतांनुसार, कंपनीने प्राप्त केलेल्या व्याजमुक्त कर्जावर मानिव आर्थिक लाभाची गणना केली आहे आणि सदर लाभ इतर इक्विटीस घेण्यात आला ज्यामुळे त्यांन्या निव्वळ किंमत स्थितीमध्ये सुधारणा झाली आहे.

ब) टीपीएलने कंपनीच्या मंडळावर दि. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी दोन संचालकांना नामांकित केले होते, जे त्यांचे नियमित कार्यरत आणि व्यवसाय पाठिंबा दर्शविते.

वरील मूल्यांकनावर आधारित, व्यवस्थापनाने सोबतचा वित्तीय निष्कर्ष गोईंग कन्सर्न तत्वावर बनविला आहे.

२. कोविड-१९ भारतासह, जगभरात पसरल्यामुळे, आर्थिक उपक्रमांमध्ये घट निर्माण झाली आहे. जरी आता परिस्थिती सुधरली असली, तरी कंपनीचा व्यवसाय/कामकाज किती प्रमाणात बाधित आला आहे हे भविष्यातील घडामोडींवर अवलंबून आहे जे अजुनही अनिश्चित आहे. जरी दि. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी कंपनीकडे रु. २०,७४४.०१ लाखांची ऑर्डर बुक केलेली असली, तरी कोविड-१९ मुळे कंपनीच्या कामकाजावर किती परिणाम होईल याबाबत किंचित अनिश्चितता आहे. तसेच, कंपनीने विशिष्ट अंदाज, संचयी माहिती आणि व्यवसायाबाबत समज आणि भविष्यातील आर्थिक स्थितीचे विद्यमान संकेत यावर आधारित “गोईंग कन्सर्न” पुनर्प्राप्तीचे मूल्यांकन आणि मालमत्तांचे वाहून जाणारे मूल्य इ. केले आहे आणि जेथे आवश्यक तेथे तडजोडी केल्या आहेत. तथापि, वित्तीय विवरणपत्राच्या मंजुरीच्या दिनांकास त्या अंदाजापेक्षा खरा परिणाम वेगळा असू शकतो.

**संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने**
**सही/-**
**विनायक के. देशपांडे**
**अध्यक्ष**

**दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२१**
**ठिकाण: पुणे**

नवाकाळ
मुंबई । सोमवार १८ ऑक्टोबर, २०२१
web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com

# चंदेरी च्वींगम



'झीरो' या हिंदी सिनेमात चमकल्यानंतर अभिनेत्री **सुश्री मिश्रा** ऑल्ट बालाजीच्या नुकत्याच लाँच झालेल्या 'कार्टेल' या वेबसीरिजमध्ये वैदेहीच्या प्रमुख भूमिकेत दिसतेय. याच पार्श्वभूमीवर तिच्याशी केलेली बातचीत...

## भूमिकेमुळे ब्लडप्रेशर तपासायला शिकले

**सुश्री, सर्वप्रथम तुमच्या भूमिकेबद्दल सांगा...**

- मी या मालिकेत वैदेही कपूर ही व्यक्तिरेखा करतेय, जी पेशाने ज्युनियर डॉक्टर आहे. ती मजबूत आणि बुद्धिमान स्त्री आहे. ती शांत आणि दयाळू असल्यामुळे तिला करावा लागलेला संघर्ष कुणाला दिसत नाही. पूर्वी अर्जुनवर (तनुज विरवानी) तिचे प्रेम होते. अजूनही ते एकमेकांना विसरू शकलेले नाहीयेत. अनेक वर्षांनी आता ते भेटले आहेत. पुढे पुढे माझी भूमिका रोचक होत जाणार आहे.

**ही भूमिका साकारताना त्यात सर्वात रोमांचकारी काय वाटलं?**

- माझ्यासाठी या भूमिकेत रोमांचक असे खूप काही होते. मला वस्तू जागच्या जागी लागतात. वैदेहीही तशीच आहे. या रोलच्या निमित्ताने मी अनेक डॉक्टर्स आणि नर्सेसना भेटले. त्यांची मानसिकता मला समजून घेता आली. ब्लडप्रेशर तपासणे, कोमामधील रुग्णांना मालीश करणे, जखमेवर टाके घालणे हे सगळं मी या तयारीदरम्यान शिकले. शिवाय सेटवर सुप्रिया पाठक मॅडम, तनुज विरवानी, जितेंद्र जोशी सर, ऋत्विक, गिरिजा आणि अन्य अभिनेत्यांची मला भरपूर मदत झाली. हा एक वेगळाच अनुभव होता.

**ही मालिका तुम्ही का स्वीकारलीत?**

- व्यक्तिरेखा, कथानक आणि स्टारकास्ट पाहून... हे सगळं मला खूपच आवडलं होतं. मला वाटलं, वैदेही कपूरकडे जी ताकद, बुद्धिमत्ता आहे, ती जशी प्रत्येक स्त्रीकडे असते ती माझ्याकडेही आहे. हा सगळा वितार करूनच मी 'कार्टेल'च्या विश्वात पाऊल ठेवायला तयार झाले.

**ही वेबसीरिज बऱ्याच काळापासून बनतेय. मधे कधी ती आता पूर्ण झाली असं तुम्हाला वाटलं का?**

- नाही. तसं वाटलं नाही. पण जीवनात चांगल्या गोष्टी व्हायला वेळ तर लागतोच. मी मेहनती आणि प्रतिभावान टीमसोबत काम करत होते याची जाणीव मला तेव्हाही होती. यामुळे कितीही वेळ लागला तरी शेवटी परिणाम चांगलाच होणार होता हे माहीत होते.

**शूटिंग करताना आलेला एखादा अविस्मरणीय प्रसंग सांगाल?**

- यात अनेक प्रकारच्या भावना दडलेल्या आहेत. असे अनेक प्रसंग आहेत जे मी विसरू शकत नाही. मला आऊटडोअर शेड्युल आवडते, कारण त्यात दगदग नसते. अनेकदा आम्ही सहळे एकत्र बसून जेवायचो. दंगामस्ती चालायची. पण सर्वात चांगली मजा सुप्रिया पाठक मॅमशी गप्पा करताना यायची. त्यांचा परफॉर्मन्स बघताना यायची. त्या अफलातून अभिनेत्री आहेत. त्यांची आठवण आली तरी मी गहीवरून जाते. सुदैवाने प्रेक्षकांनाही आमची मालिका आवडली आहे. ही वेबसीरिज ऑल्ट बालाजी आणि एमएक्स गोल्डवर स्ट्रीम होतेय.

## पूर्वा शिंदे, वैभव लोंढे पहिल्यांदाच एकत्र



'जीव माझा गुंतला', 'लागीर झालं जी' या मालिकांमधून प्रेक्षकांवर अधिराज्य गाजवणारी अभिनेत्री पूर्वा शिंदे कायमच तिच्या हटके आणि दमदार भूमिकांमुळे चर्चेत राहिलीये, तर अभिनेता, संगीतकार, गायक म्हणून वैभव लोंढेने आपली खास जागा रसिकांच्या मनात निर्माण केलीये. पूर्वा आणि वैभवची ही जोडी आता प्रथमच 'प्रेम माझं माऊथफ्रेशनर' या साँगमधून प्रेक्षकांसमोर येणार आहे. पीबीए फिल्म्स ॲण्ड म्युझिक निर्मित हे गाणे आहे. पीबीए म्युझिकने याआधी 'विठ्ठला विठ्ठला', 'नखरा', 'हे गणराया', 'पैंजण तुझं' या गाण्यातून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. प्रेयसी आणि प्रियकराच्या रोमँटिक नृत्याला ढिंच्याक गाण्याच्या साथीने असलेले हे गाणे सर्वांना घायाळ करू शकते. या गाण्याचे संगीत, गीत, वैभव लोंढे याचे असून त्यानेच ते गायले आहे. वैभवने या गाण्यात मल्टिपल जबाबदाऱ्या पेलवल्या आहेत. क्लासी ड्रेसमधील पूर्वाचा हॉटलुक आणि तिचा डान्स प्रेक्षकांना वेड लावतो का हे पाहणे रंजक ठरणार आहे.

## अक्षयकुमार पुन्हा बनणार वॉर हीरो




देशाचे रक्षण करणाऱ्या नायकाच्या अनेक भूमिका केल्यानंतर अक्षयकुमार पुन्हा एकदा वॉर हीरो म्हणून आगामी चित्रपटात दिसणार आहे. 'अतरंगी रे' आणि 'रक्षाबंधन' या चित्रपटांपाठोपाठ अक्षय कुमारने पुन्हा एकदा आनंद एल राय यांचे कलर येलो प्रोडक्शंस हे बॅनर आणि केप ऑफ गुड फिल्म्स हे बॅनर यांच्याशी हातमिळवणी केली आहे. हे सर्वजण मिळून भारतीय सेनेच्या गोरखा रेजिमेंटचे एक महान अधिकारी मेजर जनरल इयान कार्डोजो यांच्या जीवनावर बायोपिक बनवणार आहेत. या सिनेमाचे दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेता संजय पूरनसिंह चौहान करणार आहेत असे कळते. इयान काडोजी यांनी १९६२, १९६५ आणि १९७१ च्या युद्धात मोठी कामगिरी बजावली होती. त्यांची भूमिका करायला मिळाल्याने अक्षय कुमारही खूप उत्साहित आहे. यासोबतच खुद्द कार्डोजो यांनाही आपल्यावर सिनेमा बनत असल्याचा मोठा अभिमान वाटतोय.

## हृतिकने केली विक्रम वेधाच्या रिमेकला सुरुवात



अभिनेता हृतिक रोशनने दसऱ्याच्या मुहूर्तावर आपल्या आगामी विक्रम वेधा या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात केली आहे. तब्बल दोन वर्षांच्या गॅपनंतर हृतिक चित्रपटाच्या सेटवर परतला आहे. चित्रपटाच्या सेटवर हृतिकने खास अंदाजात एंट्री घेतली होती. त्याचा व्हिडिओ त्याने सोशल मीडियावर शेअर केला आहे. या चित्रपटात हृतिक कुख्यात गुन्हेगाराच्या भूमिकेत दिसणार आहे, तर सैफ अली खान पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे.

## 'इंडियाज ऑफसाईड गर्ल्स'ला न्यूयॉर्क फेस्टिवलमध्ये दोन पुरस्कार



गौतम सिंह यांच्या 'इंडियाज ऑफसाईड गर्ल्स' या चित्रपटाने 'न्यूयॉर्क फेस्टिव्हल्स टीव्ही ॲण्ड फिल्म अवॉर्ड'मध्ये छाप पाडली आहे. क्राफ्ट डिरेक्शन या विभागात या चित्रपटाने रजत तर फिल्म कॅटेगरीमध्ये कास्य पदकावर आपले नाव कोरले आहे. बिहारच्या पार्श्वभूमीवर घडणारा हा स्पोर्ट्स ड्रामा आहे. यात एका मुलींच्या ग्रुपची कथा आहे ज्यांना स्पोर्ट्समध्ये करिअर करण्याची इच्छा आहे, परंतू हे क्षेत्र फक्त मुलांसाठीच आहे असे वारंवार त्यांच्यावर बिंबवण्यात येते. अशापरिस्थितीत संजय पाठक या प्रशिक्षकाशी त्यांची भेट होते. त्यानंतर या मुलींच्या आयुष्यात कशाप्रकारे सकारात्मक घडतो. कशाप्रकारे ते त्यांना फूटबॉलचे धडे देतात हे यात पाहायला मिळेल. यापूर्वी देखील या चित्रपटाने 'द टेली अवॉर्ड लंडन', 'टॉप शॉर्ट्स युएसए', 'न्यू दिल्ली इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल', 'जयपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल' अशा विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार पटकावले आहेत.

## रामसेतूच्या शूटिंगला पुन्हा सुरुवात



कोरोनाच्या वाढत्या केसेसमुळे रामसेतू या चित्रपटाचे शूटिंग रखडले होते. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होऊ लागल्याने आता पुन्हा एकदा या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. जॅकलिनने तिच्या इन्स्टाग्रामवर ऊटीच्या टी गार्डनमध्ये शूटिंगचे फोटो शेअर केले आहेत. हा फोटो शेअर करत अभिनेत्रीने लिहिले, रामसेतूच्या टीमसोबत पुन्हा सेटवर असणे चांगलं आहे, तेही माझ्या आवडत्या ठिकाणी ऊटीमध्ये. अक्षय कुरळ्या केसांमध्ये निळा शर्ट आणि मॅचिंग पॅट्ससह दिसत आहे. दुसरीकडे, जॅकलीन खुल्या केसांसह कॅज्युअल लुकमध्ये आहे.



## नागराज मंजुळे - आकाश ठोसर पुन्हा एकत्र

सैराट या चित्रपटाला मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर दिग्दर्शक नागराज मंजुळे आणि अभिनेता आकाश ठोसर हे पुन्हा एकदा एकत्र झळकणार आहेत. नुकतीच नागराज मंजुळे यांनी घर बंदुक बिरयाणी या आगामी प्रोजेक्टची घोषणा सोशल मीडियावरून टीझर शेअर करत केली आहे. झी स्टुडिओज आणि नागराज मंजुळे प्रस्तुत या प्रोजेक्टमध्ये नागराज मंजुळे, सयाजी शिंदे आणि आकाश ठोसर मुख्य भूमिकेत आहेत. संगीत ए.व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे असून पटकथा-संवाद नागराज मंजुळे आणि हेमंत अवताडे यांचे आहेत. हा चित्रपट २०२२ मध्ये भेटीला येणार आहे. नागराज आणि आकाश पुन्हा एकत्र येत असल्याने चाहत्यांची उत्सुकता मात्र शिगेला पोहोचली आहे.



## दंगल टीव्हीवर नवी मालिका 'मन सुंदर'



छोट्या पडद्यावर दंगल टीवीने अल्पावधीतच आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आपला वेगळेपणा कायम ठेवत या वाहिनीने नुकतीच एक नवी मालिका लाँच केली. 'मन सुंदर' असे या मालिकेचे नाव असून ती आज १८ ऑक्टोबरपासून रात्री साडेआठ वाजता दाखवली जाणार आहे. मुंबईत आयोजित एका पत्रकार परिषदेत या मालिकेतील कलाकारांना सादर करण्यात आले. सध्या या मालिकेचे प्रोमो दाखवले जात असून त्यामुळेही मालिकेबाबत उत्सुकता वाढली आहे. या मालिकेत निहार गोयल या नायकाच्या भूमिकेत शिवम खजुरिया दिसणार असून नायिका रुचिताची मुख्य भूमिका श्रुती आनंद साकारणार आहे. या मालिकेचे दिग्दर्शन साबीर खान करत आहेत. संपूर्ण कास्ट पाहायची तर या मालिकेत श्रुती आनंद (रुचिता) हिच्या कुटुंबीयांत अमिताभ घाणेकर (वडील), गीता बिस्ट (आई), काजल खानचंदानी (आजी), कृष्णा गणेश (भाऊ) पलक जैन (मैत्रीण) दिसणार आहेत, तर शिवम खजुरिया (निहार) याच्या कुटुंबीयांत संजय (वडील), अपर्णा घोषाल (आई), ममता लुथरा (आजी) आणि सुरज पंजाबी (भाऊ) दिसणार आहेत.

## निकलोडियनवर 'चिकू और बंटी'

निकलोडियन या लहान मुलांसाठी असलेल्या कार्टून वाहिनीवर १८ ऑक्टोबरपासून 'चिकू और बंटी' ही नवीन मालिका सुरू होतेय. या वाहिनीची ही सलग ११वी स्वदेशी ॲनिमेटेड सीरिज आहे. यातूनही भारतीय मुलांना नजरेसमोर ठेवून कथानके रंगवण्यात आली आहेत. एका मध्यमवर्गीय घरामध्ये चिकू आणि बंटी ही दोन भावंडे आहेत. प्रत्येक कुटुंबामध्ये घडणाऱ्या भावंडांमधील गमतीजमतीही यात दाखवल्या जाणार आहेत. हा शो १८ ऑक्टोबरपासून सकाळी १० वाजता निकलोडियनवर सुरू होईल. विशेष म्हणजे या शोचे म्युझिक व्हिडिओ गीत गुलजार यांनी लिहिले आहे. या मालिकेचे सादरीकरण रोमांचक आणि वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे हा शो निश्चितच लहान मुलांचे लक्ष वेधून घेईल, असा निर्मात्यांना विश्वास आहे.



# महाशब्दकोडे-२३६५



**आडवे शब्द -**

१. मुलाखतीच्या माध्यमातून होणारी परिक्षा २. गजानन ५. आयुर्वेदिक औषध - कुमारी xxx ८. कृत्रिम दंतसंच ११. रास १२. फजिती झाल्यावर तोंड लपवणे १३. बोकड १४. रोमांचित १५. बिकट, कठीण १६. चामखीळ १७. अर्भकाचे कुरळे केस १८. रक्तशोषक कीटक १९. राष्ट्र २०. निराशावादी, रड्या २३. झाडाचे पान २४. अखंड कागद, आवेश २५. इतराजी २८. पृथ्वी ३०. खोडी ३१. शेतकऱ्यांची दिवाळी ३२. करुणा, दया ३३. टेबल ३४. येणे असलेली रक्कम मिळणे ३६. महाराष्ट्रात आढळणारा इमारतीचा प्रकार, अनेक बिऱ्हाडे असलेले घर ३८. रानटी ३९. बैरागी ४०. लायसेन्स ४१. वैर ४२. गर्दन ४३. भारतीय तंतूवाद्य ४६. लग्नाची मिरवणूक ४७. फोडणीतला मुख्य पदार्थ ४८. मंजुरी ४९. पारवा ५०. गुन्ह्याचा तपास ५२. मैत्री ५३. स्वादिष्ट, रुचकर ५५. भाग ५६. प्रयत्न ५७. हत्तीचे पिल्लू ५९. टिकाव ६१. उसाचा आटवलेला रस ६३. ताकीद ६५. ओठ, खालचा ओठ ६७. नीटनेटकेपणा ६९. उग्र वासाची पालेभाजी ७०. गडबड, कल्ला ७१. बच्चा, अननुभवी ७३. अस्थिर ७६. कपट ७७. उंटाच्या नाकातली कडी ७८. मराठी अकरावा महिना ८०. दुरडी ८२. पर्याप्त ८३. सेना ८४. मोठी बहीण ८५. कुबेराची सून ८७. नातू ८८. सुका चारा ९०. या इच्छेची पूर्ती करावीच लागते ९२. पुराणातील एक पर्वत ९३. शाकाहार ९४. किंमत ९५. इच्छा ९६. उन्हाने होणारा दाह

**उभे शब्द -**

१. हांजीहांजी, खुशामत २. गुरांचे अन्न ३. वजनदार ४. दडपण ५. विहीर ६. फळाच्या आशेने केलेले सत्कृत्य ७. गजरा ८. चलती ९. फुटाणे १०. नेत्रांजन ११. थक्क १२. सामना करणे १३. देवाचे प्रकट होणे/जन्म घेणे, ग्रंथांतून उद्धृत केलेला अंश १५. आंबटगोड पातळ भाजी १७. पतीची वहिनी १८. सलगी २१. फुलून येणे २२. कबूल २४. ज्यूट, कापडविशेष २६. मोहरी २७. नववधूचा छळ २९. दक्षता ३०. आजतागायत ३२. डोंगराचा सुळका ३४. लग्ने जुळवणाऱ्या मध्यस्थ मंडळाचे कार्य ३५. लपाछपी, लपूनछपून ३६. वृद्धी ३७. महिना ४१. घोसाळे, एक फळभाजी ४२. समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, अभिजन ४४. कुस्ती व व्यायामाची जागा ४५. ओटा, चौथरा ४९. थोडे, अल्प ५१. आपण काही न करता बसल्या जागेवरून लुडबुडेपणाने दुसऱ्यांना कामे सांगणे, तोंडाळपणा ५३. चेहरा, मुद्रा, रीत ५४. गारगोटी ५७. काव्य करणारा ५८. विपुल ६०. सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा ६२. कारस्थानी ६३. टोचणी, शल्य ६४. आनंदाने केलेला आरडाओरडा ६६. गोळा ६८. पडदा ७०. सहस्रावधी ७२. पक्ष्यांचा समूह ७४. फिकीर ७५. सगळे ७७. वरिष्ठांना दिलेली भेटवस्तू ७९. कुलीन ८१. दाढी करण्याचे पाते ८२. मुलगा ८२अ. संपूर्णता, एकूण ८४. सराईत, 'पोचलेला' गुन्हेगार ८६. ओझे ८७. मराठी दहावा महिना ८९. स्त्री ९१. मारला गेलेला •

**महाशब्दकोडे क्रमांक २३६४ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. सकल ४. तोशीस ७. इरादा ९. उमासा ११. मर्कटलीला १२. माहीतगार १४. दळभद्री १६. मोका १८. वाम १९. साखर २१. आप २२. गदा २६. पालापाचोळा २५. कुलटा २६. कातावलेला २९. ढोली ३०. टोप ३२. सुषमा ३४. हिडीस ३६. नवपरिणित ४०. फोल ४१. निर्जीव ४२. मठ ४४. लवकर ४६. भवानी ४८. ताठा ४९. पद ५१. कांत ५२. फकीर ५४. टेप ५५. आकाशगंगा ५८. वाद ६०. चूक ६१. प्राज्ञा ६२. वारेमाप ६५. आव ६६. माका ६८. सजग ७०. अग्रणी ७१. टवाळकी ७४. हिम ७५. पतित ७७. कावेरी ७८. नागली ८०. चुणूक ८२. पोटतिडीक८३. मोद ८४. फाटक ८५. नणंद ८६. मारीच ८८. फलक ९०. अंगद ९१. पारपत्र ९३. क्षुधा ९५. सभासद ९६. माठ ९८. कमी १००. कसर १०१. शिंपी १०२. सामोसा १०४. फेपरे १०६. उशीर १०७. कर्णा १०८. रानभरी १०९. खालसा

**उभे शब्द :** १. समरांगण २. कर्क ३. लटका ४. तोलामोलाचा ५. समा ६. खतम ७. इरसाल ८. दादर ९. उभयता १०. माद्री १३. हिवाळा १५. अपलाप १७. कापा २०. खटाटोप २१. आले २४. चोपडी २५. कुलीन २७. वर्ष २८. मेष ३१. परिचित ३२. सुलभ ३३. मानिनी ३४. हिवताप ३५. सम ३७. वक्ष ३८. तलफ ३९. सुकर ४३. ठपका ४५. वकील ४७. वाट ५०. दशमग्रह ५१. कांगावा ५३. किंवा ५४. टेकस ५५. आज्ञा ५६. जमा ५७. देवकीनंदन ५९. दमा ६१. प्रागतिक ६३. रेती ६४. पटवेकरी ६५. आळ ६७. काहिली ६९. जपणूक ७२. वारी ७३. नाना ७६. अटकर ७७. काडीमात्र ७९. गझल ८०. चुटकीसरशी ८१. पाणंद ८५. नगदी पीक ८७. चक्षु ८८. फटकळ ८९. कसर ९१. पाठमोरा ९२. पक्षी ९४. धाक ९६. मासा ९७. चाप ९९. मीमांसा १०३. सान १०४. फेरी १०५. रेखा

# पाकिस्तानला आयएमएफचा धक्का १ अब्ज डॉलरचे कर्ज नाकारले

■ इस्लामाबाद

**कर्ज** घेऊन दिवाळखोरीला आलेल्या पाकिस्तानला आता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमआय) जोरदार धक्का दिला आहे. आयएमएफने पाकिस्तानला १ अब्ज डॉलरचे कर्ज देण्यास नकार दिला आहे. आयएमएफची मनधरणी करण्यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांच्या सरकारने विजेसह पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत मोठी दरवाढ केली होती. तरीही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला खुश करण्यात इम्रान खान यांना यश आले नाही. आयएमएफने कर्ज नाकारल्याने पाकिस्तानला पून्हा एकदा चीन आणि



आखाती देशांकडे झोळी पसरावी लागण्याची शक्यता आहे. आयएमएफने पाकिस्तान सरकारच्या बऱ्याच विनंतीनंतर डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी ६ अब्ज डॉलरची मदत केली होती. या अंतर्गत एक अब्ज डॉलरचा हफ्ता पाकिस्तानला दिला जाणार होता. मात्र आयएमएफ आणि इम्रान सरकारमधील चर्चा निष्फळ ठरली. त्यामुळे कर्ज मिळवण्यासाठी इम्रान खान अपयशी ठरले. आयएमएफची मनधरणी करण्यासाठी पाकिस्तानचे वित्त सचिव बराच काळ वाशिंग्टनमध्ये तळ ठोकून होते. मात्र पाकिस्तानची वर्तणूक पाहता आयएमएफने कर्ज देण्यास नकार दिला. त्यामुळे इम्रान खान सरकार मोठ्या अडचणीत सापडले आहे.

# ईडी चौकशीनंतर अभिनेत्री नोरा फतेही मुंबईत दाखल

**मुंबई-** दोनशे कोटींच्या खंडणी प्रकरणी बॉलिवूड अभिनेत्री आणि मॉडेल नोरा फतेही हिची दोन दिवसांपूर्वी दिल्लीतील ईडी कार्यालयात आठ तास चौकशी करण्यात आली होती. ईडीच्या चौकशीनंतर नोरा फतेही आज मुंबईत दाखल झाली. माध्यमांचा ससेमिरा टाळत नोरा विमानतळाहून थेट आपल्या घरी रवाना झाली. यावेळी तिच्या चेहर्यावर प्रचंड तणाव दिसून येत होता. सुकेशचंद्र शेखर आणि त्याची पत्नी अभिनेत्री लीना पॉल २०० कोटी रुपये उकळल्याप्रकरणी दिल्लीच्या तिहार कारागृहात बंद आहेत. इतर लोकांप्रमाणेच सुकेशने नोरा फतेहीला त्याच्या जाळ्यात अडकवण्याचा कट रचला होता. नोरासह सुकेशच्या निशाण्यावर अनेक बॉलिवूड कलाकार आणि चित्रपट निर्माते होते. याच प्रकरणात नोरा फतेहीला ईडीने समन्स बजावले होते. या समन्सनंतर नोरा गुरूवारी सकाळी दिल्लीस्थित असलेल्या ईडी कार्यालयात चौकशीसाठी दाखल झाली होती. सलग आठ तास नोरा फतेहीची चौकशी ईडीच्या अधिकार्यांकडून करण्यात आली. त्यानंतर नोरा आज मुंबईत दाखल झाली. यावेळी माध्यमांनी तिला ईडी चौकशीबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला.

# सातारा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी सोमवारपासून अर्ज दाखल होणार

■ सातारा

**सातारा** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा निवडणूक कार्यक्रम अखेर जाहीर झाला आहे. त्यानुसार सोमवार, १८ ऑक्टोबर रोजी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. तर २१ नोव्हेंबर रोजी संचालकांच्या २१ जागांसाठी मतदान होणार आहे. २३नोव्हेंबर रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

दरम्यान, सातारा जिल्हा बँकेची अंतिम मतदार यादी ४ ऑक्टोबरमध्ये जाहीर झाली होती. परंतु कोल्हापूर आणि पुणे बँकेसंदर्भात उच्च न्यायालय याचिका दखल झाल्यामुळे सातारा जिल्हा



बँकेचा निवडणूक कार्यक्रम लांबला होता.अखेर शनिवारी तो जाहीर झाला. सोमवारपासून हा निवडणूक कार्यक्रम सुरू होत आहे. १८ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत अर्ज दाखल करणे. २६ ऑक्टोबर रोजी अर्ज छाननी आणि २७ रोजी उमेदवार यादी प्रसिद्ध होणार आहे. २७ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत अर्ज माघारी घेण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे. ११ नोव्हेंबर रोजी चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते ५ या वेळेत मतदान होणार आहे. तर २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू होणार आहे. त्याच दिवशी निकाल जाहीर होणार आहे.

# नवज्योत सिद्धू पुन्हा आक्रमक

पान १ वरून

होती. मात्र पंजाब काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणारे आणि नंतर नाट्यमय पद्धतीने परत येणारे नवज्योत सिंग सिद्धू यांनी आता नवी मागणी केली आहे. सिद्धू यांनी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना भेटण्यासाठी वेळ मागितली आहे. यावेळी त्यांनी सोनिया गांधी यांना पत्रही लिहिले आहे. मंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या मागणीसह १३ कलमी अजेंडा सादर केला आहे. त्यापैकी १२ मुद्दे हे ड्रुग्स, कृषी, वीज, सरकार आणि वीज कंपन्या यांच्यातील करार रद्द करणे तसेच इतर काही गोष्टींमध्ये न्याय मिळावा यांचा समावेश आहे. मागासवर्गीयांचा विकास, रोजगार, सिंगल विंडो सिस्टम, महिला आणि तरुणांचे सबलीकरण, दारू आणि अवैध खाणकाम या विरोधात कारवाई यावरही त्यांनी लक्ष वेधले आहे. दरम्यान, राहुल गांधी व्यतिरिक्त सिद्धू यांनी पक्षाचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल यांचीही भेट घेतली. त्यांनी पंजाबच्या प्राधान्याशी संबंधित काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यानंतर त्यांचे हे पत्र समोर आले आहे. सिद्धू म्हणाले की, १७ वर्षे राजकीय सेवा केल्यानंतर आणि जनभावना समजून घेतल्यानंतर पंजाबच्या पुनरुज्जीवनासाठी ही शेवटची संधी आहे, असे त्यांना वाटत आहे. पंजाबच्या माजी मुख्यमंत्र्यांना दिलेला १८ कलमी अजेंडा आजही महत्त्वाचा आहे. पंजाब हे बऱ्याच काळापासून देशातील सर्वात समृद्ध राज्य आहे. पण गेल्या २५ वर्षांच्या आर्थिक अनियमिततेमुळे पंजाब लाखो कोटींच्या कर्जामध्ये बुडाला आहे.

# चीनला शह देण्यासाठी 'क्वॉड' देश एकत्र बंगालच्या उपसागरात मलबार युद्धसराव

■ मलबार

**हिंदी** महासागरातील संपूर्ण वर्चस्वासाठी चीनने पावले उचलायला सुरुवात केली असून या भागातील अनेक देशांच्या सीमांवर आपले नौदल तैनात केले आहे. चीनच्या या वाढत्या वर्चस्वाला शह देण्यासाठी भारत-अमेरिका-जपान-ऑस्ट्रेलिया या क्वाड देशांचा प्रयत्न आहे. इंडो-पॅसिफिक हा समुद्री प्रदेश मुक्त आणि सुरक्षित राहिला पाहिजे, तसेच या प्रदेशातील सर्वांचे हितसंबंध समान जपले गेले पाहिजे यासाठी हिंदी महासागरातील बंगालच्या उपसागरात क्वाड देशांचा 'मलबार २१ ' हा युद्धाभ्यास सुरु झाला. या माध्यमातून भारत-अमेरिका-जपान-ऑस्ट्रेलिया हे चार देश एकत्र आले आहेत. या प्रदेशातील चीनच्या वर्चस्वाला शह मिळणार असल्याने त्याचा थयथयाट सुरू असल्याचे पहायला मिळते. इंडो-पॅसिफिक प्रदेशातील लोकशाही मूल्ये, स्वातंत्र्यता आणि विकासाच्या मुद्द्यावर हे देश एकत्रित येत आहेत. भारताच्या वतीने या युद्धाभ्यासात आयएनएस रणविजय आणि आयएनएस सातपुडा तसेच पी ८१ फ्लीट एअरक्राफ्ट सहभागी झाले आहे. येत्या काळात क्वॉड देशांची सहमती असेल तर मलबार युद्धाभ्यासामध्ये इतर काही मित्र देशांचाही सहभाग केला जावू शकतो असे अमेरिकेच्या नौदल प्रमुखांनी म्हटले आहे. क्वाड देशांच्या या युद्धाभ्यासामुळे चीनचा मात्र थयथयाट सुरु असल्याचे सूत्रांकडून समजते. चीनने वेळोवेळी मलबार युद्धाभ्यासाला विरोध केला आहे. या वर्षी एप्रिल महिन्यात झालेल्या क्वॉड देशांच्या युद्धाभ्यासात फ्रान्सनेही भाग घेतला होता.

# पुणे महिला लेफ्टनंट कर्नल आत्महत्या प्रकरणी हिमाचलमधील ब्रिगेडियरवर गुन्हा

■ पुणे

**शहरातील** वानवडी परिसरात बुधवारी सकाळी लष्कराच्या मिलेक्ट्री इंटेलिजन्स ट्रेनिंग स्कूलमधील लेफ्टनंट कर्नल पदावरील महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. त्यानंतर आज पोलिसांनी हिमाचल प्रदेशमधील आर्मी ट्रेनिंग कमांड येथील लष्कराच्या ब्रिगेडियरवर गुन्हा दाखल केला आहे. रश्मी आशुतोष मिश्रा असे आत्महत्या केलेल्या कर्नल पदावरील महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिला अधिकाऱ्याने कौटुंबिक वादातून आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात दिसून येत आहे. अजित मिलू असे गुन्हा दाखल झालेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात ४३ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. पुण्यातील वानवडी भागात मिलिक्ट्री इंटेलिजन्स ट्रेनिंग स्कूल अँड डेपो ही प्रशिक्षण संस्था आहे. इथे भारतीय लष्कर, नौदल, हवाई दल, पॅरा मिलिटरी फोर्स, नागरी गुप्तचर संस्था यामधील गुप्तचर विभागातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या ठिकाणी रश्मी मिश्रा या मृतावस्थेत आढळल्याने आत्महत्येचा संशय व्यक्त केला जात होता. मात्र कौटुंबिक वादातून त्यांनी आत्महत्या केल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. रश्मी मिश्रा या मूळ जयपूर येथे आर्मी इंटेलिजन्समधे पोस्टिंगला होत्या.

# पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना नकोच!

पान १ वरून

आणि पाकिस्तान यांच्यात भारतात किंवा पाकिस्तान इथे द्विपक्षीय क्रिकेट मालिका झालेली नाही. भारताने पाकिस्तानशी क्रिकेट खेळावं की नाही, यावरून याआधीही अनेकदा चर्चा झाली आहे. पण १९९९ साली कारगिल युद्धाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देश विश्वचषकात आमने-सामने आले होते. जगातल्या सर्वाधिक पाहिल्या जाणाऱ्या क्रिकेट लढतींमध्ये या सामन्याचा समावेश होतो. असे असले तरी भारतानं आजवर वनडे विश्वचषकात पाकिस्तानविरुद्धचा प्रत्येक सामना जिंकला आहे, हे विशेष.

भारत आणि पाकिस्तानच्या दरम्यान क्रिकेट सामना हा नेहमीच वादाचा मुद्दा ठरला आहे. पाकिस्तानशी सामने खेळावेत का नाही आणि खेळात राजकारण आणावे का नाही, या मुद्यांवरून दोन गट पडलेले असतात. त्यातच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना हा कोणत्याही युद्धापेक्षा कमी नसतो आणि याच सामन्याकरिता आयसीसीने तिकिटांचे दरही सर्वात जास्त ठेवलेले आहेत. त्यामुळे विश्वचषकातील 'भारत-पाक' सामना संयोजकांच्या दृष्टीने हा सामना फार महत्त्वाचा असतो. या सामन्याभोवतीच्या अर्थकारणावर स्पर्धेचं यश-अपयश अवलंबून असतं.

यापूर्वी २०१९ मध्ये पुलवामा येथे जवानांवर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट संघानं विश्वचषकातील पाकिस्तानविरोधी सामन्यात खेळावं की नाही, यावरून क्रिकेटविश्वात चांगलीच चर्चा रंगली होती.

**सामना न झाल्यास नियम काय सांगतो?**

आयसीसीच्या नियमावलीनुसार, एखाद्या संघाने विशिष्ट सामन्यावर बहिष्कार घातला तर तो संघ पराभूत झाला, अशी नोंद होते. मात्र दोन्ही संघ आणि आयसीसी यांच्यात सविस्तर बोलणी होऊन तोडगा निघाल्यास दोन्ही संघांना समान गुण विभागून दिले जातात.

# दिल्ली-तिरुपती विमानसेवा सुरु ज्योतिरादित्यांच्या हस्ते उद्घाटन

■ नवी दिल्ली

**हैदराबाद** आणि पुण्यानंतर आज दिल्ली ते तिरुपती या मार्गावर विमानसेवा सुरू झाली. स्पाइस जेटच्या या विमानात सेवेचे उद्घाटन नागरी हवाई उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ३१ ऑक्टोबरपर्यंत आठवड्यातून तीन दिवस ही विमानसेवा सुरू राहणार आहे, अशी माहिती स्पाइस जेटने प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.



कोरोनामुळे बंद झालेली दिल्ली-तिरुपती ही विमान सेवा सुरू करण्याची मागणी केली जात होती. याशिवाय हैदराबाद आणि पुण्यातून ही सेवा सुरू झाली आहे. त्यामुळे दिल्लीतून स्पाइस जेटची विमानसेवा आजपासून सुरू करण्यात आली. ज्योतिरादित्य शिंदे यांनी हिरवा बावटा दाखवून या विमानसेवेचे उद्घाटन केले.

# जरंडेश्वर पासून ७० बेनामी मालमत्तेत अजित पवारांच्या बहिणी व मेहुणे पार्टनर

पान १ वरून

त्यांनी केली. माझं शरद पवार यांना आव्हान आहे की, मी हे सर्व आयकर विभागाला पाठवणार आहे. सहकार मंत्रालयाला पण पाठवणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने चौकशीचे आदेश दिलेत. माझ्याकडे पुरावे आहेत. यातला एक पण कागद खोटा असेल तर शरद पवार, अजित पवार, रोहित पवार, पार्थ पवार, सुप्रिया सुळे यांनी मला हे सिद्ध करून दाखवावं, असं आव्हान किरीट सोमय्या यांनी पवार कुटुंबाला दिलं.

किरीट सोमय्या म्हणाले, हे घोटाळे पोलिसांनी उघड करायला हवे. मात्र तसे होताना दिसत नाही. हे पोलिसांचा उपयोग माफिया म्हणून काम करत आहेत. पोलीसच सुपारी घेतेय, पोलीस आयुक्तच गायब होतो, गृहमंत्री फरार होतो. हे सगळे कुणाच्या आशीर्वादाने सुरु आहे. तुम्ही मंत्री आहात जे घोटाळे केलेत त्यावर बोला ना. मी जनतेमध्ये जागृती आणण्यासाठी हे करतोय, पण पवार परिवार महाराष्ट्राच्या जनतेला लुटण्याचं काम करत आहे. ते लुटीसाठी करतात, मी ती लूट जनतेसमोर जनतेसाठी ठेवण्यासाठी काम करतो शरद पवार इतके वर्ष मुख्यमंत्री राहिले, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री आहेत. ११ घोटाळेबाज ठाकरेंचे आता १७ झाले. ६ राखीव झालेत, हे वाढत चालले आहेत. यातील एकही घोटाळ केला नाही असं म्हणण्याची हिंमत ठाकरे-पवारांमध्ये नाही. उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, लोकायुक्त, राष्ट्रीय हरित लवाद, मानवाधिकार आयोग यांच्याकडे किरीट सोमय्या जात आहे तर त्यात चूक काय?, असंही ते यावेळी म्हणाले.




नवाकाळ
मुंबई ■ सोमवार १८ ऑक्टोबर, २०२१ ■ पान- ८

## पीएमपीची भोसरी-मंचर स्वस्त बससेवा सुरू

**भोसरी -** भोसरी ते मंचर या मार्गावर पीएमपीची बससेवा सुरू झाली आहे. ती एसटीपेक्षा स्वस्त असल्याने विद्यार्थी आणि कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे. यामुळे खासगी वाहतूकदारांकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबणार असून प्रवासही सुरक्षित होणार आहे. त्यामुळे मंचरवासींचा सनई-चौघड्यांच्या निनादात या बससेवेचे जंगी स्वागत केले. मंचर आणि परिसरातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात पिंपरी-चिंचवड परिसरातील महाविद्यालयांमध्ये शिकतात. याशिवाय चाकण आणि पिंपरी-चिंचवड एमायडीसीत कामानिमित्त रोज ये-जा करणाऱ्या कामगारांची संख्याही मोठी आहे. त्यांना थेट बस सेवेची सोय नसल्यामुळे मंचर ते खेड असा पीएमपीने आणि पुढील प्रवास खासगी वाहनाने करावा लागत होता. त्याचा मोठा आर्थिक भुर्दंड त्यांना बसत होता. मात्र आता पीएमपीने भोसरी ते मंचर थेट बस सेवा सुरू केल्यामुळे त्यांची होणारी गैरसोय दूर झाली आहे.

## दर शनिवार-रविवार सायन उड्डाणपूल ३ महिने बंद! मोठी वाहतूक कोंडी होणार

■ मुंबई

**एमएसआरडीसी** अर्थात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सायन उड्डाणपुलाचे सांधे आणि नादुरुस्त बेअरिंग बदलण्याचे काम हाती घेतल्याने मुंबईकरांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. कारण एमएसआरडीसीने या कामासाठी ऑक्टोबर १५ ते ९ जानेवारी दरम्यान असे तीन महिने दर शनिवारी आणि रविवारी हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद राहणार आहे.प्रत्येक शुक्रवारी रात्री १० ते सोमवारी पहाटे ५ या वेळेत हा पूर्णपणे वाहतूक बंद लागू राहणार आहे. त्यामुळे उपनगराकडून सकाळी मुंबईकडे येणाऱ्या सायंकाळी मुंबईतून उपनगराकडे जाणाऱ्या वाहन चालकांना मोठ्या प्रमाणात



गर्दीचा सामना करावा लागणार आहे. दरम्यान,यासाठी काही मार्गांत वाहतूक पोलिसांनी बदल केले आहेत. काल शनिवारी सकाळपासूनच इस्टर्न एक्सप्रेस महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसले.शनिवारी कार्यालयातून घरी परतणाऱ्या नोकरदारांचे वाहतूक कोंडीत हाल झाले. ९ जानेवारी २०२२ पर्यंत अशाचप्रकारे दर विकेन्डला उड्डाणपुलावरील वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. मुंबईकरांनी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन मुंबई वाहतूक पोलिसांनी केले आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी शीव सर्कल येथे खासगी ट्रॅव्हल्स बसेसना प्रवेश बंदी व वाहन थांबविण्यास निर्बंध घातले आहेत. याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्गावरील अरोरा जंक्शन ते हायवे अपार्टमेंट दरम्यानच्या दोन्ही मार्गिकावर खासही बसेसना बंदी असेल.

## आप्पाचीवाडीच्या हालसिद्धनाथाची यात्रा कोरोना नियम पाळून होणार

■ निपाणी

**महाराष्ट्र,** कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांतील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या निपाणी तालुक्यातील आप्पाचीवाडीच्या हालसिद्धनाथ देवाची यात्रा यंदा कोरोनाचे नियम पाळून होणार आहे. या यात्रेत सर्व धार्मिक विधी मानकरी आणि पुजारी यांच्या उपस्थितीत होतील. मात्र हॉटेल, खेळणी, पाळणे आणि दुकानांना यात्रेत परवानगी नाही, असे येथील ग्रामस्थ आणि पोलिसांनी सांगितले. आप्पाचीवाडीच्या हालसिद्धनाथाची यात्रा २१ ते २५ ऑक्टोंबर दरम्यान होणार आहे. त्यासाठी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेला पोलीस आणि सरकारी कर्मचारीही उपस्थित होते. या बैठकीत यात्रेत सर्व धार्मिक विधी मानकरी, पुजारी आणि मोजक्या मंडळीच्या उपस्थित कोरोनाचे नियम पाळून करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र पाळणे, दुकाने, हॉटेल, खेळणी आदींना परवानगी दिली जाणार नाही. तशा सूचना पोलिसांनी दिलेल्या आहेत. त्यामुळे यंदा हालसिद्धनाथाची यात्रा कोरोनाचे नियम पाळून होणार आहे.

## मण्यार जातीचा एकच साप चावल्याने भाऊ-बहिणीचा लागोपाठ दुर्दैवी मृत्यू

■ सांगली

**खानापूर** तालुक्यातील आळसंद येथे मण्यार जातीच्या एकाच विषारी सापानेदंश केल्यानंतर भावासह बहिणीचा लागोपाठ मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना खानापूर तालुक्यातील आळसंद येथे घडली आहे. या दोघा भाऊ-बहिणीच्या मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. विराज सुनिल कदम आणि सायली जाधव अशी मृत्यूमुखी पडलेल्या बहिण-भावांची नावे आहेत. विराज याला ६ ऑक्टोबर रोजी घरी झोपेत असताना मण्यार या अतिविषारी सापाने दंश केला होता. यात सकाळपर्यंत त्याला काय झाले हे कुटुंबाला न समजल्याने उपचारासाठी रुग्णालयात नेतानाच त्याचा मृत्यू



झाला.विराजच्या रक्षाविसर्जन विधीसाठी त्याची विवाहित बहिण सायली जाधव या माहेरी आल्या होत्या. विराज याच्या रक्षाविसर्जनाचा कार्यक्रम शुक्रवारी होता. गुरूवारी रात्री सर्वजण झोपलेले असताना घरात लपून बसलेल्या त्याच मण्यार सापाने सायली यांनाही दंश केला. तत्काळ सायली जाधव यांना विटा येथील खासगी रूग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले. तेथून त्यांना पुढील उपचारासाठी सांगलीला हलविण्यात आले. परंतू गेल्या आठ दिवसांपासून उपचार घेणाऱ्या सायली यांचीही प्रकृती दोन दिवसात बिघडली. अखेर शुक्रवारी सायंकाळी उपचारादरम्यान सायली यांचाही मृत्यू झाला. सायली जाधव यांना एक वर्षांची मुलगी आहे. आईला सर्पदंश झाल्यापासून ती आईपासून वेगळी आहे. आईला भेटण्यासाठी ती आतूर झाली असून दररोज हंबरडा फोडत आहे.

## धावपट्टीच्या दुरुस्तीसाठी लोहगाव विमानतळ २९ ऑक्टोबरपर्यंत बंद

■ पुणे

**लोहगाव** विमानतळ धावपट्टीच्या दुरुस्ती कामासाठी हे विमानतळ १६ ते २९ ऑक्टोबरदरम्यान पूर्ण बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आजपासून १५ दिवस येथून एकही विमान उड्डाण होणार नाही, अशी माहिती विमानतळ प्रशासनाने दिली. मात्र याचा फटका या कालावधीत आगाऊ तिकीट घेतलेल्या प्रवाशांना बसला आहे.

लोहगाव विमानतळाच्या धावपट्टीच्या दुरुस्तीचे काम सप्टेंबर २०२० पासून हाती घेण्यात आले आहे. या कामाचा महत्त्वाचा टप्पा आजपासून सुरू झाला आहे. तो २९ ऑक्टोंबरपर्यंत चालणार आहे. या काळात विमानतळाच्या धावपट्टीवर विमानांना उड्डाण करता येणार नाही. परिणामी १५ दिवस हे विमानतळ बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. प्रशासनाने १० दिवस अगोदर ही घोषणा केल्यामुळे प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली आहे. १६ ते ३० ऑक्टोंबर या कालावधीत अनेक प्रवाशांनी आगाऊ तिकीट बुकिंग केले आहे. त्यांना याचा फटका बसला आहे. या विमानतळावरुन दररोज ६३ विमान उड्डाणे होतात. त्यात ९,८०३ प्रवासी पुण्याहून इतर शहरांमध्ये प्रवास करतात. तर या विमानतळावर दररोज ८,५२४ प्रवासी उतरतात. त्यांची यामुळे गैरसोय होणार आहे.





शिवसेना शाखा क्र. २१८, गिरगांव शाखेच्या नुतनीकरण केलेल्या वास्तुचे दिमाखदारपणे लोकार्पण शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख, पर्यटन-पर्यावरण, राजशिष्ठाचार मंत्री नामदार आदित्य ठाकरेंच्या हस्ते विजयादशमी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर संपन्न झाले. सदर प्रसंगी शिवसेना रत्नागिरी जिल्हा महिला आघाडी संपर्कप्रमुख, मा. नगरसेविका सौ. मिनल प्रविण जुवाटकर यांच्या हस्ते वृक्षवल्ली आम्हा सोयरे या मुंबईतील दुर्मिळ, दुर्लक्षित आणि मोठ्या वृक्षसंपदेचे अभ्यासपूर्ण अवलोकन करणारे पुस्तक माननिय आदित्यजी ठाकरे यांना भेट म्हणून देण्यात आहले. सदर पुस्काचे संपादन व संपादिका सौ. मुग्धा कर्णिक या गिरगावातील नामांकित असलेल्या चिकित्सक शाळेच्या माजी विद्यार्थिनी तसेच मुंबई विद्यापिठाच्या डायरेक्टर आहेत. ज्याप्रमाणे मुंबई बेस्ट उपक्रमाअंतर्गत मुंबई दर्शन हा कार्यक्रम राबिवला जातो. त्याचप्रमाणे जर मुंबई बेस्ट उपक्रमाअंतर्गत मुंबई वृक्षदर्शन हा कार्यक्रम राबविला जावा. प्रत्येक वृक्षाखाली जर सेल्फी पॉईट ही कल्पना राबविली तर याचा मोठा फायदा हा मुंबईला होईल. आपण मुंबईचे पालक या नात्याने हे काम आपल्या खात्यामार्फत अवश्य करू शकता. शहरातील दुर्मिळ, दुर्लक्षित वृक्षसंपदेचे जतन, संर्वधन पर्यावरण खात्याच्या माध्यमातून करून पर्यावरणपूरक शहर रचना आणि पर्यटन विकासासाठी उपयुक्त योजना राबविण्यासाठी.

## खा. विखे पाटलांचे उपोषण निव्वळ स्टंटबाजी सकाळी खाऊन आले, अन संध्याकाळी जेवायला गेले

■ अहमदनगर

**राज्याचे** ऊर्जा मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भाजपा खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या एकदिवसीय उपोषणावर जोरदार टीका केली आहे. तनपुरे यांनी हे उपोषण म्हणजे निव्वळ स्टंटबाजी असल्याचे म्हटले आहे. तसेच सकाळी नाश्ता करून आले आणि संध्याकाळी जेवायला घरी गेले हे कसले उपोषण अशी बोचरी टीका तनपुरे यांनी विखे पाटील यांच्यावर केली. त्याचप्रमाणे ग्रामविकास मंत्री व नगरचे पालकमंत्री हसन मुश्रीफस्वत:ची बॅलन्सशीट तपासण्यात व्यस्त असल्याने नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत नाहीत,' अशी टीका नगरचे भाजपचे खासदारडॉ. सुजय विखे पाटीलयांनी यावेळी केली होती. त्यालाही राज्यमंत्री तनपुरे यांनी उत्तर दिले आहे.'विखे सध्या निवांत झोप येणाऱ्या पक्षामध्ये गेलेले आहेत. त्यामुळे

**राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांची खोचक टीका**



त्यांना दुसऱ्याच्या बॅलन्सशीटमध्ये डोकावण्याची खुमखुमी आली आहे. कोणाची बॅलन्सशीट तपासायची असेल तर ते काम आम्हालाही येते,' असा इशाराच तनपुरे यांनी दिला. तनपुरे असेही म्हणाले की, 'पालकमंत्री मुश्रीफ हे वैद्यकीय कारणामुळे जिल्ह्यात येऊ शकले नाहीत. ते वयाने आणि अनुभावाने ज्येष्ठ व अभ्यासू नेते आहेत,याचे तरी भान टीका करणाऱ्यांनी ठेवायला हवे होते. आपली बॅलन्सशीट तपासली जाईल, या भीतीने आधीच काही लोक भाजपमध्ये गेले आहेत. उपोषणाबाबत तनपुरे म्हणाले की,हे कसले उपोषण ? सकाळी नाश्ता करून आले आणि काही तासांनी म्हणजेच संध्याकाळी जेवायला गेले. आम्हीसुद्धा आंदोलने केली.पावसात भिजत राहिलो,राहुरी तालुक्यातील प्रश्नांवर दिवसरात्र उपोषणे केली.प्रश्न सुटेपर्यंत उपोषणे केली असे तनपुरे म्हणाले.

## रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ खंडूराज गायकवाड यांची नियुक्ती



■ मुंबई (प्रतिनिधी)

**रंगभूमी** प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या सदस्य पदी पत्रकार आणि लोककला क्षेत्रात कार्य करणारे खंडूराज गायकवाड याची नियुक्ती झाली. यासंदर्भात सांस्कृतिक कार्य विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. महाराष्ट्रातील लोककलावंतांच्या प्रश्नावर कार्य करणारे गायकवाड यांनी तमाशा सम्राज्ञी कै. विठाबाई नारायणगावकर यांच्या नावाने जीवन गौरव पुरस्कार सुरू करणे, लोककलावंतना आर्थिक पॅकेज मिळण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या काळात खूप प्रयत्न केले होते. राज्यातील लोककला याचे सर्व्हे क्षण व्हावे म्हणून त्यांनी सन २०१० पासून तर आजमिती पर्यत प्रयत्न करीत आहे. १७ ऑक्टोबर २०२१रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण पंधरा जणांची या मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

## कडक लॉकडाऊन लागू केल्याने नगर जिल्ह्यातील कोरोना रुग्ण निम्म्यावर

■ अहमदनगर

**नगर** जिल्ह्यात दहापेक्षा अधिक रुग्ण असलेल्या गावांमध्ये कडक लॉकडाऊन लागू केल्यामुळे जिल्ह्यातील वाढत चाललेली रुग्णसंख्या निम्म्यावर आली आहे. शुक्रवारी जिल्ह्यात ४५८ कोरोनाग्रस्त रुग्ण आढळले होते. शनिवारी दिवसभरात २५८ नवे रुग्ण आढळले. सक्रिय रुग्णांची संख्या २,४३९ आहे. शनिवारी जिल्ह्यात ३७७ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला. कोरोनामुक्तांची एकूण संख्या ३ लाख ४२,४८७ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण आता ९७.३३ टक्के झाले.

शनिवारी जिल्हा रुग्णालयाची कोरोना चाचणी लॅबमध्ये ८५, खासगी प्रयोगशाळेतील तपासणीत १३९ व ॲटिजन चाचणीत ३४ रुग्ण आढळले. जिल्ह्यात आतापर्यंत ३ लाख ४२, ४८७ रुग्ण बरे झाले आहेत. सध्या एकूण २,४३९ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. दोन आठवड्यांपूर्वी जिल्ह्यातील ६१ गावांमध्ये दहापेक्षा अधिक रुग्ण असल्याने लॉकडाऊन जाहीर केले होते. आठवडाभरानंतर पुन्हा या गावांचा आढावा घेत काही गावांतून लॉकडाऊन मागे घेण्यात आले. सध्या २१ गावांमध्ये रुग्णसंख्या दहापेक्षा अधिक असल्याने लॉकडाऊन आहे.

## राजकीय संन्यास घेतलेल्या शशिकलांनी जयललितांच्या स्मृतिस्थळी भेट दिली

■ चेन्नई

**तुरूंगातून** सुटल्यानंतर राजकीय संन्यास घेतलेल्या अण्णा द्रमुकच्या नेत्या व्ही.के.शशिकला या नुकत्याच तामिळनाडूच्या माजी

■ **तामिळनाडूच्या राजकारणात वादळ येण्याची शक्यता**

दिवंगत मुख्यमंत्री जयललिता यांच्या समाधीस्थळी पोहचल्या. यावेळी जयललितांच्या स्मारकाला आदरांजली त्या भावूक झाल्या होत्या. त्यांच्या या भेटीने तामिळनाडूच्या राजकारणात वादळ घोंगावण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अण्णा द्रमुक पक्षाचा आज सुवर्णमहोत्सव असल्याने काल एक दिवस आधीच शशिकला या मरिना बीचवर पोहचल्या आणि त्यांनी जयललिता आणि माजी



मुख्यमंत्री एम .जी.रामचंद्रन व अन्नादुराई यांच्या स्मारकाला भेट दिली. यावेळी अण्णा द्रमुकचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भेटीनंतर शशिकला म्हणाल्या की,दिवंगत जयललिता आणि एमजीआर हे कार्यकर्ते आणि पक्षाला उभारी देतील याचा मला विश्वास आहे. पक्षाला चांगले दिवस येतील आणि त्यासाठी मी माझ्या हृदयातील सर्व ओझे मी अम्मांच्या स्मृतिस्थळी उतरवून आले आहे. तुरूंगातून बाहेर आल्यानंतर त्यांची ही समाधीस्थळी दिलेली दुसरी भेट आहे.द्रमुकला सत्तेसाठी मदत केल्याचा आळ आपल्यावर येऊ नये म्हणूनच त्यांनी ३ मार्च रोजी राजकीय संन्यास घेत असल्याची घोषणा केली होती.मात्र आता या भेटीमुळे त्या पुन्हा राजकारणात सक्रिय होऊन पक्षावर दावा सांगण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

## सूर्यमालेच्या सखोल अभ्यासासाठी 'नासा'च्या 'ल्युसी' यानाचे प्रक्षेपण

■ वॉशिंग्टन

**'नासा'ने** आता सूर्यमालेच्या सखोल अभ्यासासाठी एका नव्या मोहिमेला सुरुवात केली असून १ हजार ५०० किलो वजनी ६ मीटर लांबीच्या २ सोलर पॅनलसह 'ल्युसी' या यानाचे यशस्वी प्रक्षेपण झाले आहे. 'टलस-५' या प्रक्षेपकाच्या सहाय्याने अमेरिकेतील फ्लोरिडा येथील तळावरून आज रविवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास 'ल्युसी' अंतराळात झेपावले. हे यान पुढील १२ वर्षे प्रवास करणार असून, गुरू ग्रहाच्या कक्षेतील ८ लघुग्रहांची छायाचित्रे घेणार आहे. गुरुच्या लघुग्रहांचा अभ्यास नासाकडून केला जाणार आहे. गुरू ग्रहाच्या कक्षेत लघुग्रहांचे दोन मोठे समूह हे मागे आणि पुढे असे सूर्याभोवती प्रदक्षिणा घालत असतात. या लघुग्रहांना गुरू ग्रहाचे ट्रोजन म्हटले जाते. हे लघुग्रह सूर्यमालेच्या निर्मितीपासून अस्तित्वात आहेत,असा खगोलतज्ज्ञांचा अंदाज आहे.नासाच्या या मोहिमेमुळे सूर्यमालेच्या निर्मितीबद्दल मोलाची नवी माहिती मिळेल, अशी अपेक्षा शास्त्रज्ञांना आहे. गुरुचे ट्रोजन म्हणून ओळखल्या जाणार्या या लघुग्रहांची संख्या अडीच लाखांपेक्षा अधिक आहे. एक किलोमीटरपासून ते १०० किलोमीटर पर्यंत या लघुग्रहांचे व्यास आहेत. यातील ८ मोठ्या लघुग्रहांचा अभ्यास 'ल्युसी' यान करणार आहे.

## केरळ पाऊस! कोट्टायम भूस्खलन १८ नागरिक ठार! अनेक जण बेपत्ता



**तिरुवनंतपूरम** - केरळमध्ये जोरदार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. राज्यात अनेक ठिकाणी महापूर आला असून कोट्टायम येथे दरडी कोसळण्याच्याही घटना घडल्या आहेत. यात १८ जणांचे बळी गेले असून एक डझनपेक्षा अधिक नागरिक बेपत्ता आहेत. दक्षिण आणि मध्य केरळला पूराचा मोठा तडाखा बसला आहे. त्यामुळे तेथे लष्कराने मदतकार्य हाती घेतले आहे. या घटनेनंतर मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी तातडीची बैठक आयोजित केली. त्यात त्यांनी राज्यातील पूर परिस्थितीचा आढावा घेतला.

केरळमध्ये अतिवृष्टी झाल्याने महापूर परिस्थिती निर्माण झाली आहे. याचा मोठा तडाखा राज्यातील ६ जिल्ह्यांना बसला आहे. तेथे रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. नदी, नाले आणि ओढ्यांना महापूर आला आहे. रस्त्यांनी नद्यांचे रूप धारण केले आहे. अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. अनेक ठिकाणी भूस्खलन झाले आहे. त्यात आतापर्यंत १८ जणांचा बळी गेला आहे. १२ पेक्षा अधिक जण बेपत्ता झाले आहेत. त्यामुळे केरळच्या मुख्यमंत्र्यांनी लष्कर, नौदल आणि हवाई दलाकडे मदतीची मागणी केली आहे. राज्यातील कोट्टायम्, इडुक्की, पथनमथिट्टा या जिल्ह्यांना मोठा फटका बसला आहे. या जिल्ह्यांमधील अनेक गावांना पुराच्या पाण्याने वेढा दिला आहे. त्यामुळे त्यांचा इतर गावांशी असलेला संपर्क तुटला आहे. कोट्टायम आणि पथनमथिट्टा या जिल्ह्यांच्या डोंगर भागात अनेक ठिकाणी भूस्खलन झाले आहे. २०१८ आणि २०१९ मध्येही येथे मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने भूस्खलन झाले होते. त्याच्या तुलनेत यंदा पाऊस कमी आहे.

स्मृतिदिन



**13th Death Anniversary**
In Loving memory of our
beloed Mrs. **ANURADHA RAMCHANDRA TAWDE**
Fondly remembered
by all family members.
Mr. Ramchandra G. Tawde,
Mr. Sushil R. Tawde,
Mrs. Neha S. Tawde,
Mr. Parag R. Tawade,
Mrs. Dipti P. Tawde,
Mast. Manas S. Tawde,
Mast. Sidhant P. Tawde,
Relatives & Friends